म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. २२९१८

JRBK-0122917

20

वाचनालय नोंद
२२०९७
१७/१/८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 MAR 1998
10 FEB 20..
5 JUL 2001

(क्र. मा. पहा)
५०००-११-८६

# कार्टी श्रीदेवी

वसंत सबनीस

IRBK-0122917

श्री विशाखा प्रकाशन, पुणे ३०.

[ नील सायमन यांच्या 'आय ऑट टु बी इन पिक्चर्स' या नाटकाचा स्वैर अनुवाद ]

प्रकाशक
राजा फडणीस
श्री विशाखा प्रकाशन
५८ शनिवार पेठ, पुणे ३०

प्रथमावृत्ती : १५-८-१९८८

© वसंत सबनीस, मुंबई

मुखपृष्ठ
रमेश भारताल

मूल्य : २० रुपये

मुद्रक
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ, पुणे ३०.

एकाच ठिकाणी नोकरी करूनही
अनेक वर्षे स्नेह कायम
राहिल्याबद्दल माझे स्नेही
**श्री. राजाराम हुमणे**
यांना प्रेमादरपूर्वक अर्पण.

नों. क्र. [illegible] नों. दि. [illegible]
वि. [illegible]

## कार्टी श्रीदेवी

या नाटकाचा प्रथम प्रयोग कलावैभव, मुंबई या संस्थेने दि. १३ ऑगस्ट १९८७ रोजी सकाळी ११ वा. शिवाजी मंदिर, मुंबई येथे सादर केला. या प्रयोगात खालील कलाकारांनी व तंत्रज्ञांनी भाग घेतला.

### भूमिका

| | | |
|---|---|---|
| यामिनी | — | ज्युइली |
| कांचन | — | सविता प्रभुणे |
| कालीदास | — | सुधीर जोशी |
| नंदकुमार | — | सुनिल जोशी |

| | | |
|---|---|---|
| दिग्दर्शक | — | अरुण नलावडे |
| नेपथ्य | — | मोहन तोंडवळकर |
| पार्श्वसंगीत | — | राजा देसाई |
| प्रकाश योजना | — | अनंत पवार |
| रंगभूषा | — | दत्ता परब |
| निर्मिती व्यवस्था | — | सखाराम म्हात्रे |
| निर्माती | — | सौ. माधवी तोंडवळकर |
| सूत्रधार | — | मोहन तोंडवळकर |

## सूचना

[ या नाटकाच्या प्रयोगाचे हक्क सुरक्षित आहेत. ज्या संस्थेला किंवा व्यक्तीला प्रयोग करावयाचा असेल त्याला तालीम सुरू करण्यापूर्वी लेखकाची लेखी परवानगी घ्यावीच लागेल. मग प्रयोग तिकीट लावून असो वा विनातिकीट असो. मानधन पाठविल्याशिवाय परवानगी मिळणार नाही. त्यासाठी आधी विचारणा करावी. परवानगी न घेता प्रयोग केल्यास कायदेशीर इलाज करणे भाग पडेल. ]

पत्रव्यवहाराचा पत्ता : वसंत सबनीस, ८।८७ रामकृष्णनगर,
स्वामी विवेकानंद रोड, खार, मुंबई ४०० ०५२.

ठाणे. वाचनालय ठाणे.
२२२७८
नाटक
नों. दि. ७।५।७।७९

# अंक पहिला

♡

## प्रवेश पहिला

[ मुंबईच्या उपनगरातील म्हणजे सांताक्रूझ भागात असलेला एक जुन्या पद्धतीचा बंगला. डाव्या बाजूला बाहेरून आत येण्याचा मुख्य दरवाजा. तिथे फक्त चौकट ठेवून दरवाजाची सूचना द्यावी. कारण दरवाजाबाहेरही काही दृश्ये पुढे येणार असल्याने ती दृश्ये व पात्रे दिसण्याच्या दृष्टीने अशी चौकट आवश्यक आहे. समोर दिवाणखाना, कोच, कोचाच्या खुर्च्या, टीपॉय वगैरे. दिवाणखान्याच्या डाव्या भिंतीला लागून थोडी उंचावलेली बैठक. त्या बैठकीवर हार्मोनियम, भिंतीला टेकवून ठेवलेला तंबोरा, झाकून ठेवलेला डग्गा-तबला, व्हायोलीन. समोर बाहेर गेलेला गॅलरीचा भाग. बाहेर बाग. बाग असल्याचे सुचविणारी फुलझाडे. दिवाणखान्याच्या उजव्या भिंतीला एक खिडकी. खिडकीच्या खाली टेबल, खुर्ची, टेबलावर फोन. एक शेल्फ. तीवर गाण्याच्या कॅसेटस्. एक-दोन मानचिन्हे, सिनेमाच्या ट्रॉफी.

शेल्फला लागून मागच्या बाजूस बेडरूम, किचनला जाण्याचा मार्ग. वेळ सकाळची आहे. यामिनी सरंजामे ही पस्तीशीतील देखणी स्त्री किचनमधून हातात पिशवी व कॉफी घेऊन येते. ह्याच वेळी मुख्य दरवाजाबाहेर कांचन ही १९ वर्षे वयाची स्मार्ट, अवखळ, खट्याळ, काहीशी बालिश पण देखणी मुलगी, दाराच्या चौकटीवरील बेल वाजवीत आहे. यामिनी हातातील पाण्याचा जग टेबलावर ठेवते. जाऊन दार उघडते. ]

यामिनी : येस ?

कांचन : हाय !

यामिनी : काय पाहिजे ?

कांचन : काहीही नको. पण मला वाटतं हेच घर असावं ?

यामिनी : कुणाकडे आलीस तू ?

कांचन : पण हेच घर ना ?

यामिनी : हे घरच आहे. पण हेच घर म्हणजे मला कळलं नाही ?

कांचन : ते कालीदास कान्हेरे इथंच राहतात ना ?
यामिनी : कोणते कालीदास कान्हेरे तुला हवेत ?
कांचन : ते संगीत दिग्दर्शक वगैरे आहेत ते—
यामिनी : ते संगीत दिग्दर्शक आहेत, वगैरे नाहीत.
कांचन : म्हणजे असं की ते आधी गात होते. मग फिल्मलाइनमध्ये गेले. तिथं म्युझिक डायरेक्टर होण्याचा प्रयत्न केला— बऱ्यापैकी नाव मिळवलं— ते कान्हेरे म्हणतेय मी.
यामिनी : काही काम आहे त्यांच्याकडं ?
कांचन : हो-ना ! म्हणून तर आले. तसं थोडंसंच काम होतं. आणि तेही खासगी— पर्सनल.
यामिनी : त्यांची अपॉइंटमेंट घेतली होती आधी ?
कांचन : तशी गरज नाही वाटली. फार बिझी असतात का ते ?
यामिनी : अर्थात्— (कांचन बेधडक आत येते.)
कांचन : पण आत्ता आहेत ना घरात ? कामात आहेत ?
यामिनी : ते झोपले आहेत.
कांचन : अजून ! फारच आळशी दिसतात !
यामिनी : त्याच्याशी तुला काय करायचं आहे ? तुझं काम सांग—
कांचन : आपण ? मिसेस कान्हेरे ?
यामिनी : (गडबडते)...नाही.. नाही...मी यामिनी सरंजामे.
कांचन : पण मिस का मिसेस ?
यामिनी : आगाऊ चौकशा केलेल्या मला आवडत नाहीत.
कांचन : ओ. के. सॉरी. पण तुम्ही त्यांच्या कोण ? सेक्रेटरी ?
यामिनी : नो.
कांचन : मग ? स्वयंपाकीणबाई ?
यामिनी : मी स्वयंपाकिणीसारखी दिसते ?
कांचन : (बघून) छेः ! तुम्ही तशा मुळीच दिसत नाही. पण अंदाजानं खडे मारून बघतात तसा खडा मारून पाहिला. पुन्हा सॉरी.
यामिनी : मी त्यांची मैत्रीण आहे.
कांचन : (काहीशा आश्चर्याने व खवचटपणे) ओऽऽ ! आय सी – !
यामिनी : आय् सी चा अर्थ ? आश्चर्य वाटलं ?
कांचन : मुळीच नाही. फिल्मलाइनीतल्या लोकांना मैत्रिणी असतात हे आम्ही वाचतो ना मासिकात.
यामिनी : ओळख नसताना जादा बोलतेस असं वाटत नाही तुला ?
कांचन : शक्य आहे. पण सवयच पडलीय ना तशी !

यामिनी : पण तू कोण आहेस ?

कांचन : मी कांचन.

यामिनी : कांचन ? कोण ?

कांचन : कांचन कालीदास कान्हेरे.

यामिनी : म्हणजे ?

कांचन : म्हणजे मी— सोळा वर्षापूर्वी आम्हाला टाकून पळून इकडं आलेल्या कालीदास कान्हेऱ्यांची मुलगी.

यामिनी : मुलगी ?

कांचन : दुर्दैवानं आहे. तुमची काही हरकत ?

यामिनी : छे: ! छे: ! पण तू अशी अचानक— ?

कांचन : धक्का तर नाही ना बसला तुम्हाला ?

यामिनी : तसा बसला थोडासा— पण ते जाऊ दे— बैस. (कांचन बसते) तू येणार असल्याचं कान्हेरे बोलले नाहीत.

कांचन : संकट कधी सांगून का येतं ?... (घर न्याहाळते)

यामिनी : काय बघतेस ? (कांचन उठते)

कांचन : फिल्म लाइनीतल्या लोकांबद्दल उगाच काहीतरी कल्पना असतात डोक्यात मला वाटलं होतं...इथं खूप झुंबरं असतील....इथल्या भिंतींना स्वप्नातले रंग असतील...मंद गोड सुरांनी वातावरण भारलेलं असेल... (कोन्चावर बसते) पण इथं तसं काहीच नाही. असली भिकार घरं सोलापुरातसुद्धा आहेत. (हात आपटते, धूळ उडते) अगदी अशी धूळसुद्धा !

यामिनी : दुपारी काशीबाई नावाची मोलकरीण येऊन झाडलोट करून जाते.

कांचन : (पुन्हा हात आपटून धूळ उडवते) गेल्या चारआठ दिवसात ती आलेली दिसत नाही.

यामिनी : मला माहीत नाही. मी इथं रहात नाही.

कांचन : (आश्चर्य दाखवीत) तुम्ही....इथं...रहात...नाही ! म्हणजे दिवसा येऊन रात्री जाता की रात्री येऊन दिवसा जाता ? (यामिनी रागाने तिच्याकडे पाहते) नाही...म्हणजे मैत्रिणींचे रीतिरिवाज मला माहीत नाही म्हणून विचारलं.

यामिनी : आठवड्यातून फक्त एकदा येते.

कांचन : म्हणजे वन-डे क्रिकेट ?

यामिनी : तू सुट्टीसाठी आलीस ?

कांचन : नाही. अ सॉर्ट ऑफ बिझिनेस टूर—

यामिनी : ठीक आहे. काही घेणार ? चहा ? कॉफी ?

कांचन : नो. मला फक्त एक ग्लास थंड पाणी द्या.

यामिनी : ( पाणी देता देता ) कोणत्या गाडीनं आलीस ?

कांचन : सिद्धेश्वर एक्स्प्रेस— सोलापूर-मुंबई सोळा तास – कधी वीस तास.

यामिनी : सोळा तास ? वीस तास ?

कांचन : तासभर चालते— तासभर थांबते. सेंट्रल रेल्वे आहे ना ?

यामिनी : तशी मुंबईत येण्याची तुझी—

कांचन : पहिलीच वेळ आहे.

यामिनी : पण वाटत नाही तसं.

कांचन : तसं वाटू नये याची खबरदारी घेते मी.

यामिनी : पण कालीदास कसा उठला नाही अजून ? खरं म्हणजे उठायला पाहिजे एव्हाना. त्याला उठवायला जीवावर येतं माझ्या. अलीकडे त्याला नीट झोप लागत नाही.

कांचन : का बरं ? तब्येत चांगली आहे म्हणून, की बिघडली आहे म्हणून ?

यामिनी : आताशी थकवा येतो. अशक्तपणा वाटतो त्याला.

कांचन : बरोबर आहे. वय आणि ' काम ' यांचं प्रमाण व्यस्त झालं की असंच होणार. ( पाणी पिते )

यामिनी : हुशार दिसतेस !

कांचन : घ्या टाळी. मलाही तुमच्यासारखंच वाटतं माझ्याबद्दल; पण इतरांचं मत वेगळं आहे ना !

यामिनी : काय ग, तू मघाशी बिझिनेस टूर म्हणालीस— म्हणजे ?

कांचन : मी अभिनेत्री आहे, ॲक्ट्रेस.

यामिनी : ( आश्चर्यानं ) काय ! सांगतेस काय तू ?

कांचन : खरं तेच सांगतेय.

यामिनी : म्हणजे चक्क प्रोफेशनल ॲक्ट्रेस ?

कांचन : थोडी फार प्रोफेशनल पण बरीचशी ॲमॅच्युअर.

यामिनी : मग तुझा बराच वेळ नाटकांसाठी जात असेल ?

कांचन : नाटकांसाठी नाही पण नाटकांच्या तालमीसाठी जातो मी सारख्या तालमी करते; पण ऐन प्रयोगाच्या वेळी दुसरीलाच घेतात.

यामिनी : ओह ऽ ! आय ॲम व्हेरी सॉरी.

कांचन : डोन्ट बी सॉरी— मलासुद्धा सॉरी वाटलं नाही. मग मीच स्वतःला म्हटलं, ' नाटक गेलं उडत '—

यामिनी : मग ?

कांचन : सरळ फिल्म इन्स्टिट्यूटकडं अर्ज केला.

यामिनी : ॲडमिशन मिळाली ?

कांचन : त्यांना माझा अर्ज मिळाला; पण ॲडमिशन नाही मिळाली.

यामिनी : अग पण तू येण्याआधी तुझ्या वडलांना पत्र तरी पाठवायचंस ?

कांचन : ॲक्च्युअली मी माझ्या वडिलांना पत्र लिहिलं होतं. माझा आठवा वाढदिवस होता तेव्हा. त्यांचं उत्तरही आलं, 'हॅपी बर्थ डे टू यू !' म्हणून.

यामिनी : दॅटस गुड.

कांचन : पण त्यांचं उत्तर मिळालं तेव्हा मी तेरा वर्षांची झाले होते !

यामिनी : कालीदास आळशी आहे पत्रांची उत्तरे लिहिण्याच्याबाबतीत. तू बैस जरा. मी जवळच्या स्टोअर्समधून ब्रेकफास्टसाठी काहीतरी घेऊन येते.

कांचन : माझ्यासाठी मुळीच त्रास घेऊ नका— यामिनीकाकू.

यामिनी : शी: ! काकू काय म्हणतेस ?

कांचन : मग काय म्हणू तुम्हाला ? आत्या तर म्हणूच शकत नाही. मावशी म्हटलेलं मला चालायचं नाही. तुम्ही तशा माझ्या आईसारख्या— म्हणजे वयानं म्हणते मी ! तेव्हा काकू बरी पडते, कुणालाही चटकन चिटकवायला.

यामिनी : मला नाही आवडत काकू म्हटलेलं.

कांचन : ओ. के मग यामिनीबाई म्हणेन— मग तर झालं. तेव्हा यामिनीबाई, मला तहानभूक काहीही उरलेली नाही.

यामिनी : अग तुझ्यासाठी नाही, तरी तुझ्या वडलासाठी काही गोष्टी आणून ठेवल्याच पाहिजेत मला.

कांचन : म्हणजे ते स्वतः काहीच आणत नाहीत ?

यामिनी : म्हणून तर काळजी घ्यावी लागते मला.

कांचन : अच्छा ! म्हणजे तुमची आणि कान्हेऱ्यांची बरीच जुनी दोस्ती दिसते ?

यामिनी : ओळख तशी जुनी आहे; पण दोस्ती म्हणशील तर ती गेल्या चार वर्षांची आहे.

कांचन : अच्छा ! तरीसुद्धा तुम्ही मधून मधूनच राहता इथं ?

यामिनी : पूर्वी मी प्लेबॅक देत असे, त्यावेळी ओळख झाली. आता मी प्लेबॅक देत नाही. पण माझं ब्युटी पार्लर आहे. शिवाय माझ्या शाळेत जाणाऱ्या दोन मुलींची जबाबदारी माझ्यावरच आहे.

कांचन : म्हणजे तुम्हालासुद्धा मुली आहेत ?

यामिनी : हो— आश्चर्य वाटलं ?

कांचन : छेः छेः ! मघाशी तुम्हाला मी मिस का मिसेस विचारलं, त्याचं उत्तर मिळालं. पण तुमचे यजमान ?... म्हणजे नवरा ?

यामिनी : मी विधवा नाही एवढंच सांगते.

कांचन : द्या टाळी ! माझे वडीलसुद्धा विधुर नाहीत; पण ते कसे आहेत दिसायला ?

यामिनी : तुला माहीत नाही ?

कांचन : कसं माहीत असणार ? ते घरातून पळून गेले तेव्हा मी तीन वर्षांची होते. आणि माझा भाऊ एक वर्षाचा होता. ते गेल्यावर मम्मीनं त्यांचा एकही फोटो आल्बममध्ये किंवा घरात ठेवला नाही.

यामिनी : सॉरी !

कांचन : नेव्हर माइंड.

यामिनी : तुझ्या आईनं तुझी खूपच काळजी घेतलेली असणार !

कांचन : तिला घेता येईल तेवढी तिनं घेतली. बाकीची काळजी माझी मीच घेतली.

यामिनी : मम्मी काय करते ?

कांचन : शिक्षिका आहे बिचारी. शाळेचा वेळ सोडला तर बाकीचा सगळा वेळ ती माझ्या भावाला जास्तीत जास्त सद्‌गुणी बनवण्यासाठी खर्च करते. त्यामुळं होतं काय की, मी आणि माझी आजी आम्ही दोघंच नेहमी एकत्र असतो. खूप गप्पा मारतो आम्ही.

यामिनी : आजी म्हणजे ?

कांचन : आईची आई. खरं सांगायचं तर माझ्या आजीनंच मला सांभाळलं, मला वळण लावलं. ती म्हणते, 'पोरी, आत्मविश्वास हेच खरं माणसाचं बळ असतं.' माझ्या व्यक्तिमत्त्वातील आत्मविश्वास तुमच्या लक्षात आलाच असेल !

यामिनी : हो तर ! तू मघाशी घराची वेल ज्या पद्धतीनं वाजवलीस, तेव्हाच तुझ्यातील आत्मविश्वास मला कळून आला. हे बघ, बाजारात जाण्यापूर्वी मी कालीदासला उठवते— तू आल्याचं सांगते त्याला.

कांचन : तुम्ही बिलकुल काळजी करू नका. तुम्ही खुशाल बाजारात जा. मी बघून घेईन त्यांच्याकडं.

यामिनी : एकच कर. कालीदास उठला, तर त्याची कॉफी इथं टेबलावर ठेवते आणून, ती त्याला दे.
(यामिनी आत जाते.)

कांचन : (आपण एकटेच आहोत याची खात्री करून घेऊन स्वतःशी) आतापर्यंत तर सगळं ठीक झालं. पण तीर्थरूप पुढं येऊन उभे राहिल्यावर काय होईल ? ते कसे असतील ? कसे वागतील ? काय बोलतील ?... भलताच गोंधळ झालाय माझ्या डोक्यात. मी त्यांना म्हणू तरी काय ?

यामिनी : (आतून कॉफीचा जग व मग आणीत असताना) डॅडी म्हण—

कांचन : (दचकते) आं ? (वळून बघते. यामिनी कॉफीचा जग व मग टेबलावर ठेवीत आहे.) अय्या ऽ ! मी इतकी घाबरले ! मला वाटलं दाणकन आजीच येऊन उभी राहिली की काय माझ्या मागं !

यामिनी : तुझी आजी तर सोलापुरात असते ना ?

कांचन : छेः छेः ! ती सोलापुरात नसते.

यामिनी : म्हणजे ?

कांचन : ती स्वर्गात असावी. कारण ती खूर चांगली होती. पुण्यवान होती.

यामिनी : याचा अर्थ ?

कांचन : ती वारली ना सात वर्षांपूर्वी.

यामिनी : सात वर्षांपूर्वी ? मघाशी तर तू म्हणालीस की तुम्ही दोघी एकत्र असता ! खूप गप्पा मारता म्हणून !

कांचन : असं म्हणाले मी मघाशी ? मग नक्कीच खरं आहे ते.

यामिनी : अग पण आजी वारली म्हणतेस !

कांचन : त्याचं काय झालं— आजी वारल्यानंतर दोन वर्षांनी तिला एक चमत्कारिक हॅबिट लागली.

यामिनी : हॅबिट ?

कांचन : हो—ना ! माझ्याशी गप्पा मारायची ! त्यावेळी मी चौदा वर्षांची असेन.

यामिनी : तुझी आजी मेल्यानंतरसुद्धा तुझ्याशी बोलते ?

कांचन : विश्वास बसत नाही ना ? द्या टाळी ! ममीचा पण पहिल्यांदा विश्वास नाही बसला. ' आजी माझ्याशी बोलते ', असं मी तिला सांगितलं, तेव्हा ती काय म्हणाली माहीत आहे ?

यामिनी : काय म्हणाली ?

कांचन : म्हणाली, पोट साफ बिघडलं आहे. एरंडेल द्यायला पाहिजे.

यामिनी : कुणाला ? आजीला ?

कांचन : आजीला कसं देणार ? मला. त्यावरनं माझं आणि ममीचं कडाक्याचं भांडण झालं. भांडण म्हणजे वादावादी— शेवटी परगोर्लेक्सवर तडजोड झाली.

यामिनी : मग काही उपयोग झाला ?

कांचन : झाला ना ! ममी बोलायची थांबली. पण आजी बडबडतच राहिली. अहो, तुम्हाला माहीत आहे ? ती मला रात्री दोन वाजता दम द्यायची. ' झोपून जा ! ' असा हुकूम द्यायची. मी न जेवता झोपले तर ' जेव आणि मग झोप ' असं सांगायची. आणि वजन वाढलं की ' जेवू नकोस ' म्हणून दाटायची !

यामिनी : हं....हं...

कांचन : तुम्ही असं हं हं म्हणताय की, जशी काय मी खोटी खोटी गोष्ट सांगतेय आणि तुम्हाला ती खरी मानून घ्यावी लागतेय.

यामिनी : तसं नाही. आय कॅन अंडरस्टँड यू प्रॉपर्ली.

( तेवढ्यात फोन वाजतो. यामिनी जाऊन फोन उचलते. )

यामिनी : ( फोनवर ) हॅलो... हॅलो... येस, यामिनी सरंजामे स्पीकींग... आर. के. स्टुडिओज ? येस... कौन है ?... महंमद ? अच्छा बोलो... किसका मेसेज है ? रेखा का ? हां... हां . आर. के. स्टुडिओज में ? कितना बजे ?... ठीक है... अच्छा... अच्छा... रेखाजी को बता देना मै ठीक दो बजे वहाँ पहुंच जाउंगी... अच्छा, श्रीदेवीजी भी आनेवाली है ? ठीक है । दोनों को मै सम्हालुंगी.

( फोन ठेवते. दरम्यान कांचनचे फोनकडे लक्ष आहे. ती भलतीच प्रभावित होताना दिसते. )

कांचन : तुमचाही फिल्म लाइनशी संबंध आहे ?

यामिनी : हां. माझं ब्युटी पार्लर असल्यानं, मला हेअर स्टाइल्स करण्यासाठी स्टुडिओत जावं लागतं.

कांचन : नट्यांचा हेअर स्टाइल्स तुम्ही करता ?

यामिनी : ऑफकोर्स !

कांचन : कुणा कुणाच्या ? नावं सांगाल ?

यामिनी : बहुतेकजणींच्या. रेखा, जयाप्रदा, शबाना, श्रीदेवी—

कांचन : श्रीदेवी ?

यामिनी : हो — ( ती दरवाजाकडं जाऊ लागते. )

कांचन : जस्ट अ मिनिट. तुम्हाला माहीत आहे. माझ्यात आणि श्रीदेवीत खूप साम्य आहे. म्हणजे दिसण्यात नाही— करियरमध्ये — ती डायरेक्ट फिल्म लाइनमध्ये गेली— मी त्याच मार्गावर आहे. फरक एवढाच आहे की तिचा अभिनय लोकांना दिसला—माझा अजून दिसला नाही.

यामिनी : असेल... असेल... तू पुढच्या आठवड्यात मुंबईत असशील, तर माझ्याबरोबर चल. मी तुझी, श्रीदेवीशी ओळख करून देईन. ( दरवाजापाशी जाते )

कांचन : श्रीदेवीशी ओळख करून द्याल माझी ? वंडरफुल. यामिनीबाई, यू आर सिम्पली ग्रेट ! तुम्हाला सकाळी दारात पाहिलं, तेव्हाच मला वाटलं की ह्या बाईशी आपलं जमणार !

यामिनी : तू कालीदासकडं काही महिने राहाणार असशील ना ?

कांचन : नक्की सांगता येत नाही. कान्हेरेसाहेबांची भेट झाल्यावर आणि त्यांचा रागरंग पाहिल्यावर ते ठरेल. ( यामिनी बाहेर जाते. कांचन दार बंद करते आणि आत वळणार तोच फोन वाजतो. फोन घ्यावा का न घ्यावा अशा विचारात कांचन थोडी घोटाळते. शेवटी टेबलापाशी जाऊन फोन उचलते. )

कांचन : (फोनवर) हॅलोऽऽ हां... हां...इटस् कान्हेरेसाब का रेसिडन्स. नो...नो.... आय ॲम नॉट यामिनी. कान्हेरेसाब सो रहे है... मै?... मै उनकी सॉर्ट ऑफ डॉटर हूँ.... डॉक्टर नहीं डॉटर—लडकी—कन्या—सुपुत्री... हां... हां... लिखना पढना आता है... बोलो (लिहू लागते) हां.... रमेश वर्मा अंकल का मेसेज है...एन्. सी. सिप्पीने म्युझिक का कॉंट्रॅक्ट रिजेक्ट किया। बी. आर. चोप्रा साब को आपके ट्यून पसंद नहीं आये... हां.. हां लिख लिया... समझ गयी... हां .. हां. जरूर बताउंगी... डोण्ट वरी... बाय बाय. (फोन ठेवते. काय करावं ह्या विचारात हॉलभर फेरी मारते. तिला हार्मोनियम दिसतो. उत्साहानं हार्मोनियमपाशी बसते आणि दणादण वेडा-वाकडा हार्मोनियम बडवते. कर्कश्श आवाज होतो. त्याच वेळी कालीदास कान्हेरे हा ४५।४६ वर्षांचा गृहस्थ नाइट गाऊनमध्ये बेडरूममधून संतापून ओरडतच बाहेर येतो. त्याचे कांचनकडे अजिबात लक्ष नाही.)

काली० : अरे, हे काय घर आहे की वाद्यांच्या दुरुस्तीचं दुकान आहे? काय त्रास आहे साला! शांतपणे झोपूनसुद्धा देत नाही मला! यामिनी, तुला आज पेटी वाजवायची बुद्धी कुठून सुचली! एके काळी तुझा सुरांशी संबंध होता, यावर कुणीही विश्वास ठेवणार नाही. अग, मला रात्री नीट झोप लागत नाही, म्हणून झोपेची गोळी घ्यावी लागते, हे माहीत आहे ना तुला!

कांचन : मला माहीत नाही.

काली० : सकाळी सकाळी फालतू विनोद करू नकोस. तू केव्हा उठलीस?

कांचन : मी इथं झोपलेच नव्हते.

काली० : व्हॉट? (वळून प्रथम तिच्याकडे बघतो.) तू... तू कोण?

कांचन : मी... मी...

काली० : नवी कामवाली? मग झाडलोट करायचं सोडून, पेटीला कशाला हात लावलास? मला हे अजिबात आवडत नाही. तुझ्यासारखी मूर्ख कामवाली यामिनीनं ठेवलीच कशी? यामिनी.... यामिनी...

कांचन : ओरडू नका. घरात कुणीही नाही.

काली० : म्हणजे? घरात कुणी नाही हे पाहून तू घरात घुसलीस? तुला काय वाटलं, ही वेटिंग रूम आहे रेल्वेची? कुणीही यावं, कुणीही जावं?

कांचन : नाही... मी... मी... मी कांचन.

काली० : कोण कांचन? कुठली कांचन? कांचन नावाची एकही मुलगी माझ्या माहितीची नाही.

कांचन : हा काय माझा दोष आहे?

कालीo : शटअप! हे बघ पोरी, तू जर चोरी करायला आली असशील, तर संगीत दिग्दर्शकाच्या घरात चोरी करताना, हार्मोनियम वाजवायचा नसतो, हा प्राथमिक धडा तरी गिरवायला हवा होतास. जा, तुझा चोरीचा प्रयत्न फसला आहे. चालायला लाग— आय से गेट आऊट!

कांचन : तुम्ही ओळखलं नाही मला?

कालीo : चोरांना ओळखायला मी काय जेलर आहे? जास्त वेळ खाऊ नकोस माझा.

कांचन : तुम्हाला एक बायको होती हे तरी आठवतं?

कालीo : मला एक नाही चार बायका असतील, त्याच्याशी तुला काय करायचंय? कुणाला किती बायका आहेत, हे मोजायला नेमलंय तुला सरकारनं?

कांचन : किती बायका करायच्या, किती ठेवायच्या व किती टाकायच्या हा तुमचा प्रश्न आहे. मी फक्त एका, म्हणजे पहिल्या बायकोबद्दल बोलतेय. त्या बायकोला एक मुलगी आणि एक मुलगा होता.

कालीo : बायको म्हटली की तिला मुलगी, मुलगा किंवा दोन्ही असणारच. जगातलं हे सत्य सांगण्यासाठी तू माझी झोपमोड केलीस?

कांचन : मला वाटलं होतं की, हे मी सांगितल्यावर तुमची झोप खाडकन उडेल. त्या पहिल्या बायकोची मी मुलगी.

कालीo : असशील. पण माझा काय संबंध?

कांचन : तुमच्या संबंधापासूनच माझा जन्म झालाय.

कालीo : असं कोण म्हणतं?

कांचन : माझी ममी— मला वाटतं, ती या बाबतीत तरी खोटं बोलणार नाही.

कालीo : हे बघ, तू अजून बच्ची आहेस. असली सोंगं घेऊन तू अनेकांना फसवलं असशील, पण मी कोण आहे हे माहीत नाही तुला. कालीदास कान्हेरे— के. के.— हे नाव कानावरून गेलंय तुझ्या?

कांचन : लहानपणापासून हेच नाव, कंटाळा येईपर्यंत कानावर आदळतंय सारखं.

कालीo : हिंदी चित्रपटसृष्टीत ज्या नावाचा सर्वत्र बोलबाला आहे, तो मी म्युझिक डायरेक्टर, कालीदास कान्हेरे. कालीदास कान्हेरे ही काय चीज आहे, ते बाहेर जाऊन कुणालाही विचार.

कांचन : न विचारताच 'ही' चीज कळली मला.

कालीo : कळली असेल तर माझ्या वाटेला जाऊ नकोस. आणि एक सांगतो, इतक्या लहान वयात बनवाबनवीचे धंदे करू नकोस. हे बघ, मी रात्री दारू पीत असलो तरी सकाळी पूर्णपणे शुद्धीवर असतो.

कांचन : असाल— पण तुमच्या बोलण्यावरून तसं वाटत नाही.

कालीo : खरं सांग, तू कोण आहेस आणि कोणत्या उद्देशानं इथं आली आहेस?

कांचन : मी तुमची मुलगी— अगदी पोटची पोर म्हणतात ती.

काली० : पुन्हा तेच ! कुणीही या घरात येऊन, मी तुमची मुलगी म्हणून सांगू लागलं आणि मी ते मान्य करू लागलो, तर उद्या माझ्या बंगल्यासमोर अनाथ मुलींची रांग लागेल ! तुला काय वाटलं ? मांजरी जागोजागी पिलं घालते आणि नंतर दुसरीकडं चालू लागते, त्या जातीचा मी आहे ? आता आली तशी परत जा.

कांचन : सॉरी, मी जाऊ शकत नाही.

काली० : व्हॉट ? हे घर काय—

कांचन : तुझ्या बापाचं आहे ? असंच विचारायचंय ना तुम्हाला ! मग मी सांगते— हे घर माझ्या बापाचंच आहे

काली० : म्हणजे जबरदस्तीनं तू मला तुझा बाप बनवतेस ?

कांचन : ज्या दिवशी माझा जन्म झाला, त्याच दिवशी तुमचाही बाप म्हणून जन्म झाला हे विसरू नका.

काली० : सकाळी सकाळी तू पिऊन तर आली नाहीस ?

कांचन : मला माहीत आहे— तुम्हाला आतून धक्का बसला आहे मला पाहून. पण तुम्ही तो दाखवणार नाही.

काली० : धक्क्याच्या गोष्टी, तू मला सांगू नकोस. अग, ह्या पृथ्वीनं जेवढे भूकंपाचे धक्के सोसले नसतील, तेवढे धक्के मी माझ्या आयुष्यात पचवले आहेत. आत तुला धक्का मारून, बाहेर काढण्याची वेळ माझ्यावर आणू नकोस.

कांचन : मी तुम्हाला शपथेवर सांगते की, 'मी तुमची मुलगी आहे'.

काली० : खोटी शपथ घ्यायला हे काही कोर्ट नाही. तुला काय वाटलं ? तुझ्या ह्या बालिश चेहेऱ्याकडं बघून, मी तुझ्या शब्दावर विश्वास ठेवीन ?

कांचन : तुमच्याबद्दल जे ऐकलं होतं, त्यावरून वाटलंच होतं की, कितीही जीव तोडून सांगितलं तरी तुम्ही सरळपणानं विश्वास ठेवणार नाही. तुम्ही विश्वामित्राच्या जातीचे ना ? पण. .यावर तर विश्वास बसेल ? ( सॅकमधून एक जुनं पत्र, शाळेचं सर्टिफिकेट, आयडेन्टिटी कार्ड आणि एक फोटो काढून दाखवते. )

काली० (पत्र पाहतो) हे पत्र मी माझ्या मुलीला, तिच्या वाढदिवसानिमित्त पाठवलं होतं. हे तुझ्याकडं कसं आलं ?

कांचन : (शाळेचं सर्टिफिकेट दाखवीत) हे माझं शाळेचं सर्टिफिकेट. त्यावर माझं नाव, माझ्या बापाचं नाव व आडनाव आहे. (आयडेन्टिटी कार्ड दाखवीत) हे माझं कॉलेजचं आयडेन्टिटी कार्ड— फोटोसुद्धा आहे याच्यावर.

काली० : आणि हा फोटो ?

कांचन : ही माझी ममी. तिच्या उजव्या बाजूला मी आहे. झाली खात्री तुमची ? तेव्हा मी, कुमारी कांचन कालीदास कान्हेरे, कान्हेरे वाडा, ४७, गोल्ड फिंच पेठ, सोलापूर. मला वाटतं, एवढ्या पुराव्यावर कोर्टातसुद्धा मी तुमची मुलगी असल्याचं सिद्ध होईल.

काली० : ठीक आहे, ठीक आहे. एवढ्याशा क्षुल्लक गोष्टीसाठी कोर्ट-कचेरीची भाषा करण्याची गरज नाही. मला फक्त खात्री करून घ्यायची होती.
(कांचन थर्मासमधून कॉफी ओतून मग कालीदासला आणून देते )

कांचन : तुम्ही कॉफी घ्या म्हणजे तुमचा मेंदू थोडा कार्यक्षम होईल आणि त्याला आठवणींची पालवी फुटेल. ( कालीदास कॉफीचा घोट घेतो. ) मला वाटतं, मी तुम्हाला आधी फोन करायला हवा होता. पण इतक्या वर्षांनी फोन करणं एक तर बरं वाटलं नाही आणि तुम्ही फोनवर ओळखाल याची खात्री नव्हती. म्हणून मी थेट आले. तुम्हाला धक्का बसेल याची कल्पना होती मला पण म्हटलं, तुम्हाला हार्ट ट्रबल नसेल तर हा धक्का सहज पचेल तुम्हाला.

काली० : सॉरी, तुला विचारलं नाही. कॉफी घेणार ?

कांचन : तुमच्या पद्धतीत बसत नसेल, तर नाही दिलीत तरी चालेल. गेली सोळा वर्षं तुम्ही माया दिली नाहीत, तिथं एक कप कॉफी न दिल्यानं असा काय फरक पडणार आहे ?

काली० : हे बघ, कॉफी हवी असेल तर हवी म्हण; नको असेल तर नको म्हण. उगाच शब्दांचे फुलबाजे उडवू नकोस.

कांचन : मला कॉफी नको.

काली० : दॅटस गुड मुंबईत केव्हा आलीस ?

कांचन : काल आले. म्हटलं आज उठल्याबरोबर सकाळी पितृदर्शन करावं.

काली० : हा पत्ता कसा मिळाला तुला ?

कांचन : टेलिफोन डिरेक्टरीतून शोधून काढला मी.

काली० : टेलिफोन डिरेक्टरीतून ?

कांचन : अर्थात ! मार्गच नव्हता दुसरा. मम्मीला विचारलं, तर मम्मी म्हणाली, ' माझ्या दृष्टीनं तुझे वडील बेपत्ता आहेत '.

काली० : तुझ्या मम्मीचा शहाणपणा सांगू नकोस मला. जाऊ दे ते. आपली ती... ही.... कुठं गेली ?

कांचन : आपली नाही. तुमची यामिनीबाई ना ?

काली० : हां....हां....तीच. अलिकडं नावंही पटकन आठवत नाहीत.

कांचन : त्या बाहेर गेल्या आहेत. मला सांगूनच गेल्या.

काली० : तुझी तिची ओळख आहे ?

कांचन : आहे.

काली० : केव्हापासून ?

कांचन : अगदी बिनचूक सांगायचं, तर आज सकाळी ७ वाजून ११ मिनिटापासूनची. मी सकाळी या घराची बेल दाबली त्यांनी दार उघडलं. त्यावेळी एक्झॅक्टली ७ वाजून ११ मिनिटं झाली होती.

काली० : तुला फालतू बडबड करायची फार सवय दिसते!

कांचन : बहुतेक आजीचा वारसा माझ्याकडं आला असावा.

काली : कुणाचाही वारसा येऊ दे; पण मला पाहून तुलाही आश्चर्य वाटलं असेल ना?

कांचन : अजिबात नाही. कारण आधीच मी स्वतःला सांगितलं होतं की, इथं जो साधारण ४५–४६ वर्षांचा तऱ्हेवाईक माणूस दिसेल, तोच तुझा बाप आहे हे लक्षात ठेव.

काली० : वेल माय डॉटर, मी तऱ्हेवाईक असलो, तरी त्याचे बरेवाईट परिणाम मी भोगतो आहे. त्याबद्दल तुला मत-प्रदर्शन करण्याची गरज नाही.

कांचन : तऱ्हेवाईक मी म्हटलं नाही. इतर लोक तुमचं जे वर्णन करतात, ते मी फक्त विशेषण म्हणून वापरलं.

काली० : इथं यायचं केव्हा ठरवलंस?

कांचन : तसं मी सहा वर्षांची होते तेव्हापासून ठरवत होते, पण बालबुद्धी म्हणून माझा बेत सर्वांनी हाणून पाडला.

काली० : सरळ काय ते सांगशील?

कांचन : खरं सांगायचं तर दोन वर्षांपूर्वी मी निर्धार केला. पण घरात नेहमीच पैशाची बोंब असायची ना! मग मी दरमहा २० रुपयांप्रमाणे चोवीस महिन्यांचे ४८० रुपये साठवले. वीस रुपये इकडून तिकडून उसने घेतले आणि आले.

काली० : आणखी चार महिन्यांनी आली असतीस तर मी इथं सापडलो नसतो तुला—

कांचन : म्हणजे? पुन्हा पळून जाणार होता तुम्ही?

काली० : पळून जायला मी काय कुणाची चोरी केली की पैसे बुडवलेत?

कांचन : सॉरी. पण लहानपणापासून एकच ऐकत आले ना! तुम्ही बायको-मुलांना टाकून पळून गेलात — म्हणून तसं वाटलं.

काली० : तुझा बाप पळपुटा नाही हे लक्षात ठेव. मी घर बदलणार आहे. मला इथं रस्त्यावरच्या रहदारीचा त्रास होतो, म्हणून मी आता चौदाव्या मजल्यावर राहाणार आहे. सर्व काही व्यवस्था झाली आहे. फक्त कॉन्ट्रॅक्ट व्हायचं राहिलं आहे.

कांचन : तुम्ही कॉन्ट्रॅक्ट म्हणालात म्हणून आठवण झाली. मघाशी एक फोन आला होता— रमेश वर्मा नावाच्या माणसाचा. (फोनपाशी जाऊन निरोप लिहून ठेवलेला कागद घेऊन येते.) हा बघा, एन्. सी. सिप्पीनं तुमचं म्युझिक कॉन्ट्रॅक्ट रिजेक्ट केलं आहे. बी. आर. चोप्राला तुमचे ट्यून्स पसंत पडले नाहीत.

कालीο : ( कागद तिच्या हातातून हिसकावून घेतो. ) ठीक आहे— ठीक आहे. मला मेसेज समजला. तो रमेश वर्मा महामूर्ख माणूस आहे. फोनवरून कुणाला काय सांगायचं, हे देखील कळत नाही त्याला. ( पुन्हा कागद पाहतो. ) या मेसेजला काही अर्थ नाही. पण तुझं अक्षर मात्र चांगलं आहे—थेट माझ्या-सारखं आहे.

कांचन : असणारच ! आपला दोघांचा ब्लड-ग्रूप एकच आहे ना ?

कालीο : वयाच्या मानानं फार बोलतेस नाही तू ! तुझं वय काय असेल असं ?

कांचन : एकोणीस पूर्ण.

कालीο : एकोणीस पूर्ण ? पण वाटत नाही तसं. तुला पाहिल्यावर कुणीसुद्धा म्हणणार नाही तसं !

कांचन : कुणीही नाही म्हटलं तरी मी म्हणते ना ! एकोणीस पूर्ण.

कालीο : काळ किती झपाट्यानं जातो नाही ?... तू बघता बघता एकोणीस वर्षांची झालीस— !

कालीο : हो— पण तुम्ही न बघता बघताच मी एकोणीस वर्षांची झाले.

कालीο : मला वाटतं तुझा वाढदिवस १० ते १५ डिसेंबर दरम्यान असावा. करेक्ट ?

कांचन : जवळ जवळ करेक्ट. फक्त चार महिन्यांची चूक आहे. तेवढी चूक होणारच सोळा वर्षांत. माझा वाढदिवस येतो १६ ऑगस्टला.

कालीο : बरोब्बर ! १६ ऑगस्ट ! माझ्या पूर्ण लक्षात आहे. पण म्हटलं पाहावं तुझा वाढदिवस तुझ्या तरी लक्षात आहे की नाही ?

कांचन : आहे ना लक्षात ?

कालीο : यू आर परफेक्टली राइट. अग, तुझ्या जन्माच्या आदल्या दिवशी सोलापुरात काय धमाल चालली होती ! झेंडावंदन काय, बँड काय, भाषणं काय, गावात पताका, राष्ट्रध्वज फडफडत होते... आणि लगेच दुसऱ्या दिवशी तुझा जन्म !

कांचन : क्या बात है ! मानलं तुम्हाला ! तुमच्या स्मरणशक्तीची कमाल आहे ! माझ्या जन्माच्या आधीचा बारीकसारीक तपशीलसुद्धा तुमच्या आठवणीत आहे ? वा ! आपल्या देशाचं स्वातंत्र्यसुद्धा धन्य झालं असेल !

कालीο : त्याचा काय संबंध ?

कांचन : स्वातंत्र्याचा वाढदिवस माझ्या वाढदिवसाच्या आधी एक दिवस असतो ना ?

कालीο : खरं म्हणजे तुझ्या जन्मामुळं स्वातंत्र्याचा वाढदिवस माझ्या लक्षात राहिला. मला हे सुद्धा आठवतंय— तू जन्मलीस तेव्हा वीत दीड वितीची होतीस. तुला आठवतच असेल ?

कांचन : न आठवायला काय झालं ? तुम्ही हाताच्या वितीनं माझी लांबी मोजलीत ते सुद्धा आठवतंय. तुम्हाला नाही आठवत ?

कालीο : आठवतंय तर— मी हॉस्पिटलमध्ये आलो होतो— तू पाळण्यात होतीस.

कांचन : माझ्या माहितीप्रमाणं त्यावेळी मम्मी हॉस्पिटलमध्ये गेलीच नव्हती. तिचं बाळंतपण घरातच झालं.

काली० : करेक्ट ! पण त्या घरातल्या बाळंतिणीच्या खोलीला मी थट्टेनं मॅटर्निटी हॉस्पिटल म्हणत असे तिथंच तुझी न् माझी पहिली ओळख झाली. करेक्ट ?

कांचन : करेक्ट ! तुम्ही मला पाहिल्याबरोबर म्हणालात, 'हॅलो बेबी, हाउ डू यू डू !' मला पक्कं आठवतंय. तो दिवससुद्धा माझ्या लक्षात आहे.

काली० : मूर्ख पोरी, त्यावेळी अक्कल नावाची गोष्टच तुझ्याजवळ नव्हती. दोन दिवसाच्या अर्भकाला आठवण नसते. मी मूर्खासारखं बडबडतो, म्हणून तू सुद्धा बडबडलंच पाहिजे असं नाही.

कांचन : सॉरी.

काली० : ते जाऊ दे. अर्भकावस्थेत तू कशीही असलीस तरी आता मात्र तू एक गोड, नाजुक, ग्रेसफुल सुंदर तरुणी झाली आहेस.

कांचन : खोटं बोलू नका. मी सुंदर नाही हे मला माहीत आहे.

काली० : कोण म्हणतं नाही म्हणून ? तू सुंदर नाहीस असं जो म्हणत असेल त्याला माझ्यापुढं आणून उभा कर

कांचन : म्हणजे हजारो लोकांना तुमच्यापुढं आणायला पाहिजे. ते मला जमायचं नाही.

काली० : लोक मूर्ख असतात. जे लोक मला तऱ्हेवाईक म्हणतात, अपयशी म्हणतात, तेच लोक तुला तू सुंदर नाहीस असं म्हणतात. लोकांकडे लक्ष देऊ नये. आपण आरशात पाहावं.

कांचन : आरशात फक्त आपणच आपल्याला दिसतो.

काली० : करेक्ट ! मी तेच करतो. लोक मला दारूबाज म्हणतात, चारित्र्यहीन समजतात, अपयशी मानतात. पण मी आरशापुढं उभा राहून आरशाला विचारतो— मी दारूबाज आहे ? चारित्र्यहीन आहे ? अपयशी आहे ? प्रत्येक प्रश्नाला आरशातून उत्तर येतं-- नो. आपण खूष होतो-- आरसाही खूष होतो. म्हणून म्हणतो, आपण आपल्याला सुंदर, बुद्धिमान समजल्यानं कुणाच्याही बापाचं नुकसान होत नाही.

कांचन : तुम्ही माझे वडील आहात. तेव्हा तुम्हाला मी सुंदर वाटणारच.

काली० : अग, तसा गेली १९ वर्षं मी तुझा बाप आहे.

कांचन : थँक्यू !

काली० : कशासाठी ?

कांचन : गेली १९ वर्षं बाप असल्याचं मान्य केल्याबद्दल. आणि पुन्हा थँक्यू मला सुंदर म्हणाल्याबद्दल ! पण मला बरं वाटलं. तुम्हाला माझी ओळख पटली. तू माझी मुलगी नाहीस असा हेका धरून मला हाकलून दिलं असतंत तर मी काय करणार होते ?

काली० : बनवाबनवी करणारी माणसं मला आवडत नाहीत. ती तू केली नाहीस हे कळलं. बरं वाटलं. मी प्रसंगी खोटं बोललो असेन, थापा मारल्या असतील; पण मी ढोंगी आयुष्य कधीच जगलो नाही. माझ्या आयुष्याच्या प्रदर्शनातले सगळे स्टॉल्स मी उघड्यावर मांडले आहेत. असा हा उघड्या मनाचा आणि उघड्या चारित्र्याचा तुझा बाप आहे.

कांचन : तरी पण मला अजून अवघडल्यासारखं झालं आहे. तुम्हाला काय म्हणून हाक मारू तेच कळत नाही.

काली० : हात्तिच्या, एवढंच ना ? काहीही म्हण— बाबा, आबा, तात्या, नाना, पपा, डॅडी—

कांचन : (एकदम मोठ्याने) मग बाप म्हटलं तर ?

काली० : आजचा जमाना बापाला बाप म्हणायचा नाही ना !

कांचन : मग तीर्थरूप म्हणू ?

काली० : तीर्थरूप ? माझी हाडं तीर्थावर पोचल्यासारखं वाटेल. त्यापेक्षा तू सरळ कालीदास म्हण किंवा के. के. म्हण— के. के. !

कांचन : के. के. ? ओके— मिस्टर कालीदास कान्हेरे, आता आपला परस्पर परिचय झाला आहे, तेव्हा लेट अस् शेक हॅंडस्—

काली० : शेक हॅन्डस् ? अग तू या भारतात— महाराष्ट्रात जन्मली आहेस तेव्हा थोर भारतीय परंपरेप्रमाणं मुलीनं बापाच्या पाया पडायचं असतं— बापानं आशीर्वाद द्यायचा असतो.

कांचन : म्हणजे, बाप मुलीला तिसऱ्या वर्षी सोडून पळून गेला असला तरी, मुलीनं पाया पडायचं असतं ?

काली० : हे बघ, तू सारखी जिभेला काटे लावून बोलणार असशील, तर आपला संवाद होणार नाही.

कांचन : ओ. के.... ओ. के... मी पाया पडते.
(सिनेमा स्टाइलने एक हात पायाला लावून लगेच हात वर घेते.)

काली० : अग, मुलीनं वाकून, दोन्ही हातांनी तीनदा नमस्कार करण्याची पद्धत आहे आपली.

कांचन : पण हिंदी सिनेमात असाच नमस्कार करतात ना ? तुम्ही हिंदी चित्रपटांना संगीत देता, तेव्हा तुम्हाला ही पद्धत पसंत पडायला हरकत नाही.

काली० : ठीक आहे— ठीक आहे. नमस्कार काही एवढा महत्त्वाचा नाही. बाय द वे— तुझी मम्मी कशी आहे ?

कांचन : फाइन, सर्वसाधारण परित्यक्ता असते तशीच आहे. पण आता तिच्यात एक महत्त्वाची सुधारणा झाली आहे.

काली० : कोणती ?

कांचन : ती आता पूर्वीसारखी रडत नाही.

काली० : पण तिनं परित्यक्ता राहण्याचं कारण नव्हतं. तिनं दुसरा जोडीदार निवडला असता तरी चाललं असतं.

कांचन : तिला निवडायचा असता तर तिनं तुमची परवानगी विचारलीच नसती.

काली० : पण कुणीच आलं नाही पुन्हा तिच्या आयुष्यात ?

कांचन : तसा थोडासा संभव निर्माण झाला होता एकदा.

काली० : ( उत्सुकतेनं ) कसा ? केव्हा ? कोण होता तो ?.... सांग....सांग मला—

कांचन : अरे वा ! तुम्हाला इतकी उत्सुकता असेल असं वाटलं नव्हतं मला. आमच्या घराजवळच एक नवीन डेअरी निघाली होती. त्या डेअरीचे मालक होते बलभीम पाटील. विधुर होते. दूध द्यायला स्वतः यायचे.

काली० : मग त्यानं काय केलं ?

कांचन : पहिल्या पहिल्यांदा माझ्यासाठी अन् बल्ल्यासाठी पेपरमिंट, चॉकोलेट, लिमलेटच्या गोळ्या आणायचे. आम्हाला वाटलं की मामला जमला बहुतेक ?

काली० : मग काय झालं ?

कांचन : आम्ही लहान होतो ना ! आम्हाला त्यातलं काय कळणार ? मग आमचं चॉकोलेट, पेपरमिंट बंद झालं आणि त्यांच्याकडून येणारं दूध रोज नासायला लागलं. तेव्हा आम्ही समजलो की मामला फिसकटला

काली० : अच्छा ! अशी भानगड झाली म्हणायची. पण ते जाऊ दे. आपला बळवंत कसा आहे ?

कांचन : बळवंत ? कोण बळवंत ?

काली० : अग तुझा धाकटा भाऊ.

कांचन : मग बल्ल्या म्हणा की !

काली० : त्याला तुम्ही बल्ल्या म्हणता ? अग त्याचं नाव चांगलं बळवंत ठेवलं आहे.

कांचन : पण सगळेजण त्याला बल्ल्या म्हणतात

काली० : मी त्यावेळी केवढ्या हौसेनं त्याला लोकमान्य टिळकांचं नाव ठेवलं होतं— बळवंत.

कांचन : हो— पण त्याला बळवंत म्हणायला कुणीच तयार नाही. इतकंच नव्हे तर त्याला स्वतःलासुद्धा आपलं नाव बल्ल्याच आहे असं वाटतं.

काली० : अरेरे ! कुठं बळवंत आणि कुठं बल्ल्या !

कांचन : तुम्ही त्याला पाहिलं नाहीत अजून. अहो कुठल्याही अँगलनं पाहिलं तरी तो बल्ल्याच वाटतो

काली० : तुझ्या ममीनं बळवंताचं बल्ल्या केलं असणार कारण ते नाव मी ठेवलं होतं ना ! तुझं नाही बदललं ? कारण ते तिनं ठेवलं होतं. तुम्हाला शाळेत तेव्हा बाप म्हणून तरी माझं नाव ठेवलं का तुमच्या नावापुढं ?

कांचन : मत्राशी सर्टिफिकेट बघितलंत ना तुम्ही ? बापाच्या जागी तुमचंच नाव आहे. माझे मराठीचे सर गमतीनं म्हणायचेसुद्धा, 'काय ग, हा तुझा बाप फक्त नावापुरता बाप ना ?'

काली० : मी तिथं असतो तर त्याचं थोबाड रंगवलं असतं. अरे, शिक्षकासारख्या जबाबदार माणसानं, असला फालतू विनोद करायचा म्हणजे काय ? तो मरू दे तुझा मास्तर. मला सांग, हा तुमचा बल्ल्या अभ्यासात हुषार आहे का ?

कांचन : तसा हुषार आहे. वर्गात नेहमी पंचविसाच्या आत नंबर असतो.

काली० : वर्गात एकूण मुलं सव्वीस असतील ! काही खेळ वगैरे खेळतो की नाही ? हॉकी, फुटबॉल, क्रिकेट ?

कांचन : खेळतो तर—

काली० : काय खेळतो ?

कांचन : लंगडी.

काली० : लंगडी ? फारच छान. आणखी काही ?

कांचन : एकदा आमच्या गल्लीत दसऱ्यानिमित्त लिंबू-चमचा शर्यत झाली. त्यात बल्ल्या तिसरा आला. खरं म्हणजे तो चौथाच यायचा. पण थोडक्यात चुकलं आणि तो तिसरा आला.

काली० : पण तुझं सामान कुठं आहे ?

कांचन : एका लॉजवर.

काली० : कुठलं लॉज ?

कांचन : परळचं. दुर्गादेवी लॉज. एका खोलीत चार बायका, सुमारे दीड हजार ढेकूण आणि दोन हजार डास. पण डास जाऊन-येऊन असतात.

काली० : शीः शीः शीः !— तू असल्या लॉजमध्ये राहतेस ? तू कुणाची मुलगी आहेस याची चाड धर थोडीशी !

कांचन : चांगल्या हॉटेलात उतरायचं म्हणजे पैसे लागतात मी, मम्मी अन् बल्ल्या गरीब आहोत ना !

काली० : कळला तुझा शहाणपणा. हे बघ, तू मुंबईत आहेस तोपर्यंत इथं राहायचं.

कांचन : पण माझी अडचण व्हायची नाही ना तुम्हाला ? त्यापेक्षा मी लॉजवरच ठीक आहे.

काली० : बापाचं थोडं तरी ऐक. मुकाट्यानं इथं येऊन राहा. मुंबईत किती दिवस राहाणार आहेस ?

कांचन : साधारण चार-पाच वर्षे.

काली० : काय ! चार-पाच वर्षे ?

कांचन : नंतर कदाचित हॉलिवुडला जाईन.

काली० : व्हॉट ? हॉलिवुड म्हणालीस तू ?

कांचन : येस . हॉलिवुडला करियरसाठी.

काली० : कसली करियर ?

कांचन : फिल्म लाइन.

काली० : ( आश्चर्यानं ) फिल्म लाइन ?

कांचन : हां. तिथं ट्रेनिंग घेऊन परत आल्यावर हिंदी फिल्मलाइनमध्ये यायचा विचार आहे माझा.

काली० : हिंदी चित्रपटात ?

कांचन : एवढं आश्चर्य का वाटतं तुम्हाला ?

काली० : हिंदी चित्रपट व्यवसाय म्हणजे—

कांचन : का ? तुम्ही त्याच व्यवसायात आहात ना ? ( इकडे तिकडे बघते ) तसं तुमचं फारसं चांगलं चाललं नसलं तरी बऱ्यापैकी चाललेलं दिसतंय. स्वतःचा बंगला आहे. जुनी का होईना पण गाडी आहे.

काली० : माझी गोष्ट सोड. पण फिल्म लाइनमध्ये तू काय करणार आहेस ? मेकअप आर्टिस्ट, ड्रेस डिझायनर की—

कांचन : हिरॉइन होणार आहे मी !

काली० : हिरॉइन ? ( तिच्याकडे पाहत राहतो )

कांचन : का ? एवढं नवल वाटलं तुम्हाला ?

काली० : हिरॉइन व्हायचं म्हणजे सोपं काम नाही जरा फिल्म मॅगेझिन्स वाच—

कांचन : वाचते ना— हिरॉइन व्हायचं म्हणजे सारखी कुणाशी तरी लफडी व्हावी लागतात. मी प्रयत्न करीन—

काली० : कसला ? लफडी करायचा ?

कांचन : कमाल आहे मिस्टर कालीदास कान्हेरे ! लफडं ही करण्याची गोष्ट नाही, ते आपोआप होत असतं आता ह्या गोष्टी मी तुम्हाला सांगायच्या म्हणजे ज्ञानेश्वराला वेद म्हणायला सांगितल्यासारखं होईल

काली० : तुझं डोकं फिरलं आहे. हिरॉइन व्हायला टॅलंट लागते. मी किती कष्ट केलेत याची कल्पना नाही तुला. उसळपाव खाऊन दिवस काढलेत मी... टॅलंट-शिवाय काहीही होत नसतं—

कांचन : टॅलंट टॅलंट काय करताय तुम्ही ! माझ्याजवळ भरपूर टॅलंट आहे. कितीतरी लोक म्हणतात की माझ्यात कधी श्रीदेवी तर कधी शबाना आझमीच्या छटा दिसतात.

काली० : पुन्हा सांगतो, लोक गाढव असतात. जे लोक तुमचे ढोल वाजवतात, तेच लोक तुम्ही घसरला की तुमच्या नावानं शंख करतात. तुझ्यात टॅलंट आहे असे म्हणणारे कोण आहेत हे लोक ?

कांचन : तीन तरी नक्कीच आहेत एक बल्ल्या, दुसरी आजी आणि तिसरी मी.

काली० : तू नुसती वयानंच वाढली आहेस, अकलेनं अजिबात वाढली नाहीस. डोक्याच्या बाबतीत तुझ्या मम्मीचा वारसा सांभाळला आहेस! छान! आपल्याला ॲक्टिंगचा काही अनुभव ?

कांचन : आहे तर ?

काली० : कुठं ? गल्लीतल्या गणेशोत्सवातल्या नाटकात ?

कांचन : नाही शाळेतल्या नाटकात आम्ही बल्ल्याचं एक मराठी नाटक बसवलं होतं.

काली० : बल्ल्याचं नाटक ? म्हणजे तुमचा बल्ल्या नाटक वगैरे लिहितो का काय ? लिंबू चमचा शर्यतीत भाग घेऊन नाटक लिहितो ? म्हणजे संगीत-दिग्दर्शकाचा पोरगा नाटक लिहितो म्हटल्यावर कान्हेन्श्रांच्या वेचाळीस पिढ्या स्वर्गात आनंदानं नाचत असतील ?

कांचन : त्या पिढ्या काय तुम्ही संगीत दिग्दर्शक झाल्यापासूनच नाचायला लागल्या असणार ?

काली० : कसलं नाटक लिहिलं होतं बल्ल्यानं ?

कांचन : बर्फातील ठसे. म्हणजे त्यानं भाषांतर केलं होतं

काली० : इंग्रजी नाटकाचं ?

कांचन : नाही, मराठी नाटकाचं. मूळचं नाव 'हिम मानव' असं होतं—

काली० : वाहवा! खरं म्हणजे मीसुद्धा आनंदानं नाचायला पाहिजे! मराठीचं मराठीत भाषांतर करणारा सुपुत्र माझ्या पोटी आला! मला धन्य वाटलं! बाकी तुमचा बल्ल्या भलताच हुशार आहे. मग तू काय हिरॉइनचं काम केलं होतंस त्यात ?

कांचन : नाही, हिरॉइनच्या नर्सचं. हिरॉइन मरते तेव्हा मला रडायचं होतं ---

काली० : छान!

कांचन : अशी रडायचे मी— ( हुंदके देत रडू लागते. )

काली० : बस बस बस! तुझं हे परिणामकारक रडणं ऐकून आजुबाजूचे लोक धावत येतील इथं, माझं काही बरंवाईट झालं असावं असं समजून—

कांचन : म्हणजेच माझं ॲक्टिंग इफेक्टिव्ह आहे हे तुम्हाला मान्य आहे ?

काली० : ह्या लाइनमध्ये येणाऱ्या प्रत्येकाला स्वतःच्या अभिनयाबद्दल विश्वास असतो. पण नुसत्या विश्वासानं काहीही होत नसतं. तुझी क्वालिफिकेशन्स, अनुभव, बक्षिसं यांची यादी आहे तुझ्याजवळ ? केवळ रडणारी नर्स अन् श्रीदेवीच्या छटा यांचा काहीही उपयोग नाही, कळलं ?

कांचन : मी त्यांना ॲक्टिंग करून दाखवीन माझ्या बॅगेत नाटकाची पुस्तकं आहेत. ती रोज मी वाचते. तुम्ही म्हणालात तशी टॅलंट भरपूर आहे माझ्याजवळ. फक्त संधी मिळाली पाहिजे.

कालीο : संधी ? तुला स्टुडिओच्या दारात सोडव; पण समोरच्या रस्त्यावरसुद्धा कुणी उभं करणार नाही सिनेमाची मासिकं वाचून काहीतरी खूळ डोक्यात घेतलं आहेस तू... आलीस तशी चार दिवस राहा आणि परत सोलापूरला जा...

कांचन : मिस्टर कालीदास कान्हेरे, आजकाल वशिल्यानं पुष्कळ गोष्टी होऊ शकतात. तुमचं वजन आहे ना फिल्म लाइनमध्ये ? मग एक फोन करा रमेश सिप्पीला — काम होऊन जाईल.

कालीο : तुला काय वाटतं, तू सांगितलंस म्हणून मी लगेच फोन करीन ! मुळीच करणार नाही.

कांचन : कारण तुमचं वजनच नसावं तिथं. आणि समजा त्यातूनही तुम्ही केलात तर एक लक्षात ठेवा, तुम्ही कोणत्या भावनेनं फोन करता याला महत्त्व आहे.

कालीο : कोणत्या भावनेनं म्हणजे ?

कांचन म्हणजे असं की, आपण गेल्या सोळा वर्षांत मुलीच्या बाबतीत बापाचं कर्तव्य पार पाडलं नाही, आपण भलतेच बेजबाबदारपणे वागलो, तेव्हा त्याची भरपाई करण्यासाठी करून टाकू या एखादा फोन— अशा भावनेनं मुळीच फोन करू नका.

कालीο : असं बोलायला कुणी शिकवलं बाळ तुला ? आईनं हेच वळण लावलं तुला ?

कांचन : असं म्हणजे कसं ?

कालीο : हेच, आत्ता बोलतेस तसं. म्हणजे मागच्या जिन्यानं गच्चीवर जायचं, तिथनं पाइपला धरून खाली उतरायचं— खिडकीतून बाथरूममध्ये यायचं आणि दिवाणखान्यात येऊन विचारायचं— किती वाजले ? हे बघ, तुला जर मला काही सांगायचं असेल तर सरळ सरळ साग

कांचन : ओ के. ! मी सरळ सांगते, तुम्ही माझे देणेकरी लागता.

कालीο : कोण ! मी ?

कांचन : हो, तुम्ही मला आजीनं बजावून सांगितलंय की तू मुंबईला जा, आणि तुझं गेल्या सोळा वर्षांचं जुनं कर्ज व्याजासकट वसूल कर.

कालीο : अच्छा ! तुझ्या आजीनं हे तुला सांगितलं ? तुझ्या आजीला सध्या कामधंदा काहीच नसतो वाटतं ?

कांचन : कामधंदा नसावा— एकदा स्मशानाबाहेरच्या बाकावर आम्ही बसलो होतो. तिथ तिनं मला सांगितलं.

कालीο : तुम्हाला दुसरी कुठलीही चांगली जागा सापडली नाही बोलायला ? तुझी आजी मम्मीजवळच राहाते ना ?

कांचन . कशी राहणार ? मेल्यानंतर माणसाला घरात राहता येत नाही ना ?

कालीο : अच्छा ! इट्स् गुड न्यूज -- माझी सासू स्वर्गवासी झाली ?.... पण केव्हा ?

कांचन : सात वर्षांपूर्वी— पण गेल्या आठवड्यात माझ्याशी बोलली—

कालीο : वा! स्मशानात ती अगदी मोकाट सुटलेली दिसते! आणि मेली तरी बडबड कमी झालेली दिसत नाही! तिचं वर्षश्राद्ध करता की नाही? तिच्या आत्म्याला नाही तरी निदान जिभेला शांती मिळाली पाहिजे!

कांचन : आजीबद्दल आपण पुन्हा केव्हा तरी बोलू. सध्या माझा एकच सवाल आहे. तुम्ही मला हिरॉइन व्हायला मदत करणार आहात की नाही?

कालीο : तू कोण समजतेस स्वतःला? मी माझ्या बापाचंसुद्धा ऐकलं नाही, तिथं तू कोण? अचानकपणे तू माझ्या घरात घुसलीस, नळ फुटावा तशी बदाबदा बोललीस-- माझ्या मुलाचं नाव बळवंतचं बल्ल्या केलं आहे हे आता मला कळतंय. हा हुशार मुलगा मराठीचं मराठीत भाषांतर करतो. माझी एके-काळची बायको डेअरीवाल्याशी दोस्ती करते. सात वर्षांपूर्वी मेलेली सासू स्मशानाबाहेर येऊन माझ्या मुलीला माझ्याविरुद्ध चिथावते. हे सगळं एकदम पचायला जड आहे.

कांचन : आम्ही हे सगळं पचवलं आहे. एक लक्षात ठेवा, मी तुमच्याकडं भीक मागायला आले नाही.

कालीο : तुझ्याशी बोलणं मुष्कील आहे. तुझी बोलून बोलून दमछाक झाली आहे. तू थोडा श्वास घे आणि मलाही घेऊ दे. हे बघ, आतापर्यंत आपली जी शब्दांची जुगलबंदी झाली ती विसरून जाऊ या तू माझी मुलगी नाहीस आणि मी तुझा बाप नाही--

कांचन : (उसळून) काय!

कालीο : असं क्षणभर समजू या. आपण दोन सभ्य भारतीय नागरिक असून एकमेकांना प्रथमच भेटतो आहोत असं समजू या. तेव्हा तणातणी न करता आपण एकमेकांचं कुशल विचारू या.

कांचन : (रुक्षपणे) नमस्ते! कसे आहात तुम्ही? तुमचं सर्व कुशल आहे ना?

कालीο : चालेल. माझं सर्व कुशल आहे. आपण चहा-कॉफी काही घेणार?

कांचन : नको.

कालीο : हे बघ कांचन, फिल्म लाइन हा विषय फार किचकट आहे. त्याबद्दल आपण सवडीनं बोलू. ओ. के.!

कांचन : ते केव्हाही बोला अगर बोलू नका; पण एक लक्षात ठेवा गेल्या सोळा वर्षांत मी तुमच्याकडं काहीही मागितलं नाही.

कालीο : तू दिसायला तुझ्या आईसारखी नसलीस, तरी बोलणं मात्र थेट तिच्यासारखं आहे.

कांचन : हे बघा, माझ्या मम्मीला यात ओढू नका. तिचा तुमच्या-माझ्या बोलण्याशी काहीही संबंध नाही. कसं का होईना, पण तिनं आम्हाला सांभाळलं आहे. तुमच्यासारखं आम्हाला टाकून पळून गेली नाही ती.

कालो० : तू आल्यापासनं पळून जाण्याचं काय तुणतुणं लावलं आहेस ? पळून जायला-मुद्धा धाडस लागतं. पळून जाणारी माणसंच मोठी होतात. रामदास स्वामींचं उदाहरण माहीत आहे ना तुला ? मी पळून गेलो— अगदी दिवसाउजेडी पळालो-- तुझ्या आईच्या आणि आजीच्या डोळ्यासमोर पळालो-- हे मला माहीत असताना तू पुन्हा पुन्हा त्याचा उल्लेख का करतेस ?

कांचन : मला वाटतं मी इथून निघून जाणं बरं, नमस्ते. आपण माझं स्वागत केलंत, याबद्दल मी आपली आभारी आहे. मी माझ्या वडिलांना भेटायला आले होते. पण त्यांची भेट झाली नाही असं त्यांना सांगा...

(कांचन उठून जाऊ लागते.)

कालो० : थांब, तुझ्या डोक्यात आपल्या बापाबद्दल काही भलत्याच कल्पना असतील आणि त्याप्रमाणे मी तुला वाटलो नसेन तर माझा नाइलाज आहे. तुला वाटलं असेल की तू सोळा वर्षांनंतर भेटतेस, तेव्हा मी व्याकूळ होऊन ' ये, बाळ ये ' असं म्हणून पश्चातापानं पावन झालेल्या अश्रूंनी तुला न्हाऊ घालीन. तुझ्याकडं लगेच तुझ्या मम्मीची क्षमायाचना करणारं पत्र देईन-- तसं काहीही होणार नाही. माझं जहाज मी केव्हाच समुद्रात लोटलं आहे. त्याची शिडं फाटली, डोलकाठी वाकली, वादळ आलं, तरी मी तसाच वल्हवत राहणार आहे. पुन्हा किनाऱ्याकडं परत येणार नाही.

कांचन : असलं शिडं फाटलेलं जहाज लवकरच बुडतं एवढं लक्षात ठेवा.

कालो० : बुडालं तरी तुम्हाला मदतीसाठी बोलावणार नाही. तुला माझ्याकडून काय मदत पाहिजे ते बोल माझ्या दारात आलेल्या माणसाला मी तसाच परत पाठवीत नसतो

कांचन : ( पुन्हा भडकते ) मी काही भिकारीण नाही तुमच्या दारात आलेली. अरे तुम्ही रडू नका माझ्यासाठी मी मेल्यावरसुद्धा ! पण बाप म्हणून एकदा तरी प्रेमानं हात फिरवलात का माझ्या डोक्यावरून ? माया दाखवलीत का थोडी तरी ? तुम्ही बाप नाही दगड आहात दगड. हे तुमचं गचाळ घर, ती मोडकी वाद्यं, हा कचरा रेल्वेची वेटिंग रूमसुद्धा बरी असते यापेक्षा. तुमची झाली एवढी ओळख पुरेशी आहे, आणखी होण्याची मुळीच गरज नाही. मी तीन वर्षांची होते तेव्हापासून तुमच्या एकेक गोष्टी सांगून, आजीनं अन् मम्मीनं तुमची चांगली ओळख करून दिली आहे मला. पण मी तिकडं कधी लक्ष दिलं नाही. कारण तो तुमचा आणि मम्मीचा प्रश्न होता. मी तुमचा आधार मागायला आले नाही. मी स्वतःच्या पायावर उभी राहू शकेन, तुम्ही गेलात उडत. फिल्म लाइनमध्ये माझ्याही ओळखी आहेत, तुम्हाला काय वाटलं ?

कालो० : कुत्रं तरी ओळखतं का तुला ?

कांचन : यामिनी सरंजामे हे नाव ऐकलंय तुम्ही? मम्मीला तिचा राग येईल कदाचित; पण माझं तिचं पटतं. ती तुमच्यापेक्षा हजारपटीनं चांगली आहे.

काली० : शटअप! तोंडाला येईल ते बडबडू नकोस —

कांचन : तुम्ही तरी काय करता आहात मघापासून? आजी वारली ही तुम्हाला गुड न्यूज वाटली. बऱ्या लिहिण्याचा प्रयत्न करतो तर तुम्ही त्याची टवाळी करता? मम्मी निराधार झाली, एकटी राहिली तर तिची भानगड म्हणता? अन् तुम्ही? बायको-पोरांना टाकून सोळा सोळा वर्षं दूर राहता, दारू पिता, बायकांची लफडी करता! संगीत दिग्दर्शक म्हणून तुम्हाला मोठे म्हणणारे कुणी असतील ते असोत; पण बाप म्हणून मला विचाराल, तर मी सांगेन, तुम्ही फडतूस आहात.

काली० : (रागानं) कांचन, तुझ्या मम्मीच्या घरात वाट्टेल ते बोललेलं चालत असेल, पण इथं माझ्या घरात चालणार नाही.

कांचन : अरे, कोण तुम्ही? माझ्या आजीची टिंगल करायचा कुणी अधिकार दिला तुम्हाला? मी मनाला येईल ते बोलणार.

काली० : पण मी तुझा बाप आहे याची जाणीव ठेव.

कांचन : बाप? कोण बाप? कुणाचा बाप? कुठला बाप? मी बापबिप जाणत नाही.

काली० : (ओरडून) कांचन, तुझी जीभ फारच सैल सुटायला लागलीय माझ्या सहनशीलतेचा अंत पाहू नकोस.

कांचन : जीभ माझी आहे. ती सैल सोडायची का तिची घडी घालून ठेवायची हे माझं मी ठरवीन. (गलबलून) मी सोळा वर्षांची नाजूक स्वप्नं साठवून ती इथं घेऊन आले; पण तुम्ही त्यांची माती केलीत!
(यामिनी दारात येऊन चूप उभी राहते. ऐकत राहते.)

काली० : तुला कुणी आमंत्रण देऊन बोलावलं नव्हतं इथं. काहीही करून ये आणि मला भेट, असा तळमळीचा निरोप मी पाठवला नव्हता तुला. तुझ्या पायानं तू आलीस. मुलगी आहेस म्हणून तुला समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचं तुला काहीच नाही! माझ्या घरात येऊन बेगुमानपणे बडबडतेस— मला अपमानास्पद बोलतेस! (पॉझ) माझ्यावर सूड उगवायचा तुझ्या मम्मीचा तर डाव नाही ना हा?

कांचन : माझी आजी म्हणत होती तेच खरं ठरलं शेवटी. आजी म्हणत होती की, एकदा माणूस नागडा होऊन गावभर भटकून आल्यावर, घरात त्यानं लंगोटी लावली काय किंवा धोतर नेसला काय-–शेवटी तो निर्लज्जच!

काली० : मेल्यानंतरही तुझी बिनडोक आजी तुझ्यासमोर असली भाषा वापरते?

कांचन : मेल्यानंतर नाही—मरायच्या आधी ती असं म्हणायची.

यामिनी : ( आत येता येता ) तुमचं भांडण नाक्यापर्यंत ऐकू जातंय. काय, चाललंय काय हे ?

कांचन : (यामिनीकडे लक्ष न देता) मिस्टर कालीदास कान्हेरे, एक शेवटची गोष्ट सांगते ती ऐका. फिल्म लाइनमध्ये ज्याची टिमकीसुद्धा ऐकू येत नाही ते तुम्ही आहात. तुमचं संगीत मोठे प्रोड्यूसर रिजेक्ट करतात. मि. कान्हेरे, माझी गाडी स्लो आहे; पण ती अपट्रेन आहे. तुमची गाडी सुपरफास्ट असेल; पण ती डाउन ट्रेन आहे. तुमचा सूर्य अस्ताला चालला आहे. त्याचं तेज संपलं आहे. कुणी सांगावं! एक दिवस असा उगवेल की त्या दिवशी मला पद्मभूषण पदवी किंवा दादासाहेब फाळके ॲवॉर्ड अगर फिल्म फेअर ॲवॉर्ड मिळालेलं असेल. षण्मुखानंद हॉलमध्ये मोठा सोहळा होईल. माणसांची गर्दी उसळलेली असेल, हॉलमध्ये पाय ठेवायलाही जागा नसेल या सोहळया-साठी माझ्या मर्सिडीस गाडीतून एक तासभर उशीरा येईन. माझ्या एका बाजूला श्रीदेवी, तर दुसऱ्या बाजूला शबाना आझमी असेल. तुम्ही कुठेतरी कोपऱ्यात बसलेले असाल. त्यावेळी मी माझ्या भाषणात सांगेन की, आज, आपण माझा जो सत्कार करीत आहात, त्याचं सारं श्रेय माझ्या आजीला, मम्मीला, माझ्या भावाला, मैत्रिणींना, शबानाजीना, श्रीदेवीजीना, यामिनीजीना आणि आपल्यातील एक इसम सोडून - तुम्हा सर्वांना आहे. तो इसम म्हणजे, माझा बेजबाबदार बाप! असा माणूस नागडा होऊन गावभर फिरून आल्यावर त्यानं घरात लंगोटी लावली काय अगर धोतर नेसला काय, तरी तो निर्लज्जच! (आजुबाजूला पाहून) मला वाटतं इतकं भाषण पुरेसं झालं ( यामिनीला ) यामिनीबाई, तुम्हाला माझं बोलणं आवडलं नसेल तर माफ करा. सॉरी! गुडबाय!

कालीo : थांब. तुझी मूर्खपणाची बडबड मी ऐकून घेतली, ती तुझ्या थोबाडीत मारायची नाही असा मनाशी निर्धार केला होता म्हणून. तुझ्या मम्मीच्या आणि आजींच्या दोषांची यादी वाचावयाची झाली तर त्याला दोन दिवस पुरणार नाहीत. मी सोलापूर सोडलं तेव्हा जो काही पैसा-अडका, स्थावर-मालमत्ता होती, ती सगळी तुझ्या मम्मीच्या हवाली केली होती. मुंबईत येऊन स्वतःच्या हिमतीवर हा बंगला, गाडी घेतली. तुझ्या मम्मीकडे कधीही हात पसरला नाही. एकदा बोललीस ते बोललीस; पण माझ्या घरात येऊन माझ्याबद्दल अपशब्द वापरलेले मी पुन्हा खपवून घेणार नाही तुला जे काही म्हणायचं असेल ते सभ्य भाषेत म्हणावं लागेल. ते करायचं नसेल तर या घराचा उंबरठा पुन्हा ओलांडून आत यायचं नाही कळलं ? तू जाऊ शकतेस. (कांचन शांतपणे आपली बॅग उचलते आणि दाराकडे जाऊ लागते.)

यामिनी : अशी रागावून जाऊ नकोस, ऐक माझं!

कांचन : (रडत) काही नको. माझं काहीही होवो; पण मी या घरात पुन्हा पाऊल टाकणार नाही. मला भिकारीण समजतात? जो मायेच्या बाबतीत स्वत: भिकारी आहे, तो दुसऱ्याला काय देणार?

काली० : मघाशी मी तुला बजावलं आहे. या घरात—
(ती दाराबाहेर जाऊन उभी राहते.)

कांचन : आता तर मी तुमच्या घरात नाही? पण जाताना एवढंच सांगते की, तुमच्यासारखा माणूस नागडा बनून गावभर फिरून आल्यावर—

काली० : (ओरडून) चालती हो! (कांचन ताडकन जाते.) आजची सकाळ एकदम बेसूर झाली आहे. चालत्या गाडीला अचानक ब्रेक लागल्यावर जसा धक्का बसतो तसं झालं आहे. तुझ्या आणि मद्याच्या आस्वादात कालची रात्र कशी चांदणं नेसून सुगंध शिंपीत आली होती. पण सकाळ खटाऱ्यात बसून आल्यासारखी आली.

यामिनी : तिनं तुला आधी कळवून यायला हवं होतं हे खरं आहे. पण तिला वाटलं असेल की तुला आश्चर्याचा गोड धक्का द्यावा.

काली० : वा! धक्का दिला ना तिनं मला, बाप नाही दगड आहात म्हणून! अरे ही काय मुलगी आहे? ही सोळा वर्षांनंतर मला अचानक भेटते आणि तिच्या डोक्यावरून प्रेमानं हात फिरवला नाही म्हणून माझी हजामत करते? मी म्हणे तिच्या मनातल्या कल्पनेप्रमाणं वागलो नाही-- म्हणून काय तिनं इथं येऊन अमिताभ बच्चन स्टाइलनं डायलॉग मारायचे? स्मशानाबाहेर भेटलेल्या आजीनं तिला इथं यायला सांगितलं काय, मुंबईत ही पहिल्यांदा येते काय आणि टेलिफोन डिरेक्टरीतून माझा पत्ता शोधते काय? सारं अजबच आहे! अग रामन राघवचा पत्ता शोधायला मुंबईच्या कार्यक्षम पोलिसांना चार महिने लागले आणि हिनं बारा तासात माझा पत्ता शोधून काढला?

यामिनी : अरे, मुली बापवेड्या असतात. त्यातीलच ही तुझी मुलगी.

काली० : माझी मुलगी म्हणून काय वाटेल ते ऐकून घेऊ? बोलण्याला काही धरबंध? काही मर्यादा? मुलीच्या जातीला न शोभणाऱ्या पद्धतीनं ही बोलते! माझ्या तोंडावर मला बेजबाबदार म्हणते! नागडा, निर्लज्ज म्हणते! अरे, हे आहे काय! आमच्या लहानपणी आम्ही वडील माणसांसमोर बसतसुद्धा नव्हतो.

यामिनी : तुझ्याबद्दलचा इतक्या वर्षांचा कोंडलेला राग उफाळून आला असेल. अर्थात् मला यात नाक खुपसायचं काहीही कारण नाही म्हणा—

काली० : अगदी बरोबर बोललीस. तू यात नाक न खुपसशील तर बरं!

२२९९६ ... ९८३.९१.५

यामिनी : फक्त माझ्या दृष्टीनं मला या गोष्टीचा विचार केलाच पाहिजे. सकाळी मी तिला इथं दिसले, तेव्हाच तिला तुझ्या-माझ्या संबंधाची कल्पना आली असेल. तिला काय वाटलं असेल ?

काली० : तिला काहीही वाटलं तरी तुला त्याची पर्वा करायचं कारणच काय ? मी कुठं करतोय तिची पर्वा ? ह्या कालीदास कान्हेऱ्याच्या आयुष्याचा ग्रंथ उघडा आहे.

यामिनी : तुझं ठीक आहे. पण मला किती अपराधी वाटलं ते तुला कळायचं नाही. गेला महिनाभर मी या संबंधी तुझ्याशी बोलते आहे; पण तू निर्णय घेत नाहीस. हा माझ्या एकटीचा प्रश्न नाही. माझ्या मुलींच्या भवितव्याचा प्रश्न मला महत्त्वाचा वाटतो. त्यांना मी नाही वाऱ्यावर सोडू शकत.

काली० : बस्स ! आली तुझी गाडी पुन्हा त्याच लग्नाच्या स्टेशनावर. यामिनी, आज सकाळपासून माझ्या डोक्याला झालेला त्रास पुरेसा आहे. तू पुन्हा त्यात भर न घालशील तर बरं.

यामिनी : म्हणजे ! तू फक्त तुझाच विचार करणार आहेस का ?

काली० : हे बघ, तुला जर तडकाफडकी निर्णय हवा असेल तर आत्ता सांगतो—यावेळी माझ्या घड्याळात साडेनऊ वाजले आहेत. तू आता शोधण्यासाठी बाहेर पडलीस तर लंचटाइमपर्यंत माझ्यापेक्षा तरुण आणि देखणा जोडीदार तुला सहज मिळेल. तू खुशाल त्याच्याशी लग्न कर आणि मोकळी हो. ( तेवढ्यात फोन वाजतो. कालीदास उचलतो. ) हॅलो ! ... कांचन ? कोण कांचन ? कुठली कांचन ?... कांचन-बिंचन कोणी नाही इथं....हां....हां... ठीक तरहसे सुन रहा हूं....क्या ?... ( एकदम थंड होऊन ) आहे....कांचन फोटो स्टुडिओ ? वहां से आप बात कर रहे है ? ..आप का शुभनाम ?... नंदकुमार ? (यामिनी त्याच्या हातातून फोन जवळ जवळ हिसकावून घेते.)

यामिनी : माझा आहे फोन... ( फोनवर ) हॅलो...हॅलो....नंद ? हां...हां...मैं यामिनी हूं...जी ..जी ..जी...देखो, यहाँसे मैं बात नहीं कर सकती हां ...हां ... फन्टॅस्टिक ! ... आय वुइल लव्ह टू वर्क फॉर हिम ... जरूर ... जरूर ... ठीक बारा बजे मैं वहाँ पहुंच जाऊंगी ... बाय .... बाय ( फोन ठेवते. )

काली० : अच्छा ! हाच नंदकुमार काय ?

यामिनी : होय. कॅमेरामन आहे. अतिशय उमदा अन् उत्साही आहे. ही इज हॅंडसम टू. आय लाइक हिम.

काली० : म्हणजे तुला लंचटाइमपर्यंतही थांबायला नको.

यामिनी : नो. वुइ आर मीटींग बिफोर लंच. दोन नवीन पिक्चर्सचं ड्रेअर ड्रेसर म्हणून मला कॉन्ट्रॅक्ट मिळतंय. नंद ट्राइड फॉर इट.

काली० : छान! एकेकाळची पार्श्वगायिका, आज ड्रेअर ड्रेसरचं कॉन्ट्रॅक्ट मिळतंय म्हणून खूष होतेय!

यामिनी : त्याला इलाज नाही.

काली० : बाय द वे-- लग्न झालंय का ह्या नंदकुमारचं?

यामिनी : मी विचारलं नाही. तुला तरी आधी विचारलं होतं? ... मला जायला पाहिजे लगेच.

काली० : हो ... ना ... तो ताटकळत बसेल उगाच--

यामिनी : कांचनचं काय करणार आहेस?

काली० : ती मूर्खासारखी बडबडली तरी पोटची पोर आहे. तिला वाऱ्यावर सोडता येणार नाही. मी तिला इथंच आणणार आहे. तुझी काही हरकत?

यामिनी : अजिबात नाही. उलट शक्य तितक्या लौकर आण असं मीच तुला सांगणार होते. बापाच्या मायेसाठी मुली किती हपापलेल्या असतात, याचा अनुभव आहे मला. पण एक लक्षात ठेव. कांचन इथं असेपर्यंत मी रात्री इथं राहू शकणार नाही.

काली० : एवढी घाबरतेस तिला?

यामिनी : तिलाच नव्हे तर माझ्या मुलींनासुद्धा. मी तुझ्याइतकी बेदरकार होऊ शकत नाही तू आपल्या संबंधाबाबत जोपर्यंत निर्णय घेत नाहीस--

काली० : मला वाटतं पुन्हा वाद सुरू होण्यापूर्वी तू जावंस हे बरं, म्हणजे मला शांतता मिळेल.

यामिनी : मला तरी वेळ कुठं आहे? मघाशी ब्रेड आणि अंडी आणून ठेवली आहेत तुझ्यासाठी. मी नंदबरोबरच लंच घेईन अच्छा. बाय बाय!

( ती जाते. कालीदास बघत राहतो. अस्वस्थ होतो. काय करावं हे सुचत नाही. इकडे तिकडे फिरतो, पेटीजवळ येतो. पेटीशी बसून पेटी वाजवू लागतो. )

( अंधार होतो. प्रवेश संपतो. )

□

# अंक पहिला

♡

## ( प्रवेश दुसरा )

[ वेळ रात्रीची. कालीदास व कांचन बाहेरून येतात. कांचनच्या पाठीवर सॅक. कालीदास बोलत बोलत दार उघडतो. आत येतो. दिवा लावतो. पण कांचन तशीच दरवाजाबहेर उभी आहे. ]

कालीο : ( येता येता ) तुला माहीत आहे ? पंचवीस वर्षापूर्वी या सांताक्रूझ भागात संध्याकाळी सात वाजले की सगळीकडे शुकशुकाट असायचा. आठ वाजताच कोल्हेकोई ऐकू यायची. ( वळून पाहतो. कांचन दिसत नाही ! ) अरे कुठं गेली ही पोरगी ? ( बाहेर पाहतो ) अग, तू अजून बाहेरच उभी आहेस ? आत ये...

कांचन : आधी मला हे सांगा, तुम्ही खरोखरच मला इथं राहायचं आमंत्रण देत आहात ?

कालीο : कमाल आहे तुझी ! अग तुला मुंबईभर हिंडवून आणलं, चांगलं जेवायला घातलं, शंभर-दीडशे रुपये तुझ्यासाठी खर्च केले, हे सगळं कशासाठी केलं मी ?

कांचन : सगळं केलंत ते ठीक झालं; पण तुम्ही मला इथं येण्याचं फॉर्मल इन्व्हिटेशन कुठं दिलंत ?

कालीο : फॉर्मल इन्व्हिटेशन ! बाई ग--आता या मध्यरात्रीच्या वेळी छापखान्यात जाऊन, नक्षीदार कार्डावर सोनेरी अक्षरात, तुझ्यासाठी आमंत्रण पत्रिका छापून आणावं, अशी का तुझी अपेक्षा आहे ?

कांचन : तुम्ही माझ्या लॉजवर येऊन एवढंच म्हणालात, उचल सामान... चल बाहेर !

कालीο : मग काय म्हणायला हवं होतं ?

कांचन : अहो, रेल्वेच्या स्लीपर कोचमध्ये जागा नसताना घुसलं, आणि कंडक्टरला ५-१० रुपये नाही दिले, तर तोही असंच म्हणतो—उठाव सामान, निकलो बाहर.

कालीο : हद्द आहे तुझ्यापुढं ! सकाळी ह्या घरातून जाताना जेवढा हट्टीपणा केला होतास, तेवढाच घरात येताना करतेस ! ठीक आहे. राजकुमारी कांचनदेवी, आम्ही आपल्याला नम्रपणे अर्जी पेश करतो की, आपले सोन्याच्या मोलाचे चरणकमल, या गरीबाच्या घराला लावावेत, आणि आपल्या पायाची धूळ इथं टाकून, या घराला व आम्हाला धन्य करावे.

कांचन : आता कसं अगदी शाही पद्धतीनं आमंत्रण दिल्यासारखं वाटलं. ठीक आहे. आदरणीय म्हणू का ? म्हणते झालं—आदरणीय पिताजी, आपल्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून, आम्ही आमच्या पायाची धूळ आपल्या घरात खुषीने झाडत आहोत. (आत येऊन पाय आपटते) सॉरी ! आपल्या घरात आधीच भरपूर धूळ आहे. त्यात आम्ही भर घातली याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

कालीο : यावे...यावे. कांचनदेवी, तुमच्या आगमनानं आम्हाला अतिशय आनंद झाला आहे.

कांचन : याबद्दल आम्ही आपले एहसानमंद आहोत. आम्ही इथं आलो खऱ्या; पण आम्हाला दोन दिवसापेक्षा जास्त दिवस राहता येईल असे वाटत नाही.

कालीο : अग, सकाळी तर चार-पाच वर्षे राहाणार आहे असं म्हणाली होतीस ना ?

कांचन : कसं शक्य आहे ? अहो, तुमच्या या मुंबईत कुकिंग गॅससुद्धा महिनाभर राहात नाही.

( कालीदास कांचनची सॅक कोचावर ठेवतो. )

कालीο : आज तू इथं झोप. उद्या तुझी खोली साफ करून घेऊ.

कांचन : चालेल. ( बसते. पुन्हा उठते. खिडकीशी जाते. बाहेर बघते. ) डॅडी, इतकी रात्र झाली तरी तुमच्या ह्या मुंबईत इतकी माणसं रस्त्यात कशी दिसतात हो ?

कालीο : ही मुंबईची स्पेशॅलिटी आहे. थोडी माणसं घरी जातात, थोडी माणसं रात्रपाळीला जातात आणि उरलेली माणसं रस्त्यावर फिरतात. त्याशिवाय काही माणसं लोकल गाड्यात उभं राहून आयुष्य घालवतात.

कांचन : पण, हे घर तरी तुमच्या मालकीचं आहे ना ?

कालीο : माझ्या मालकीचं ? खरं सांगायचं तर या घराचे खरे मालक आहेत मोठे मोठे उंदीर आणि त्यांच्या बायका. त्यांनी हे घर झुरळांना भाड्यानं दिलं आहे. आणि मी झुरळांचा पोट-भाडेकरू म्हणून राहतो. रोज रात्री किचन-मधून ते आपलं भाडं वसूल करतात.

कांचन : इतके उंदीर आणि झुरळं ?

कालीο : अग, मुंबई महानगरपालिकेचं भूमिगत वैभव आहे ते !

कांचन : पण डॅडी, हे घर तसं अगदीच टाकाऊ नाही. साफसफाई केली, रंग लावला तर मस्त दिसेल. सकाळी मी प्रथम पाहिलं तेव्हा हे घर संगीत दिग्दर्शकाचं वाटलं नाही. रद्दी, डबे-बाटलीवाल्याचं वाटलं.

काली० : चाललीस तुझ्या वळणानं !

कांचन : नाही, सरळपणानं सांगते. इकडे तिकडे थोडी सुधारणा केली तरी काम भागेल. मी रंगसुद्धा देऊ शकेन. आता तुमच्या गाडीबद्दल बोलू या का ?

काली० : गाडीबद्दल काय बोलणार आहेस ?

कांचन : तुमची गाडी भिकार आहे.

काली० : माझ्यात चांगला पॉइंट दिसलाच नाही का तुला ?

कांचन : हा तुमचा पॉइंट नाही, गाडीचा आहे. म्हणजे मला असं वाटलं की, माझी आजी मरायच्या आधी जशी खोकत होती, तशी तुमची गाडी खोकते.

काली० : एवढंच ना ? थोड्या वेळानं मी ग्लायकोडीनची बाटली ओतीन तिच्या इंजिन-मध्ये. पण एक लक्षात ठेव- ती गाडी खोकत असली तरी, ती इतक्यात मरणार नाही तुझ्या आजीसारखी. अनेकांनी माझी साथ सोडली; पण गाडीनं कधीही सोडली नाही. आणखीन एक— ज्यातलं कळत नाही त्याबद्दल हातभर बोलू नये.

कांचन : मला गाडीतलं सगळं कळतं. तुम्हाला माहीत नसेल; पण गाडी चालवण्या-पासनं दुरुस्तीपर्यंत सगळं येतं मला. कलभीम पाटलानी शिकवलं. त्यांना खरं म्हणजे बल्ल्याला शिकवायचं होतं; पण मीच शिकले

काली० : छान केलंस ! गुड नाइट ! मी झोपतो जाऊन.

कांचन : तुमच्यासाठी कॉफी करू मस्तपैकी ?

काली० : नो, थँक्स आय नीड रेस्ट.

कांचन : म्हणजे ? तुम्ही झोपायला निघालात ! इतक्यात ? आपण तर तशा गप्पाही मारल्या नाहीत अजून ! या आधी आपण गप्पा मारल्या त्यावेळी मी तीन वर्षांची होते—गेल्या सोळा वर्षांच्या गप्पा शिल्लक राहिल्यात अजून.

काली० : ही सोळा वर्षांची गॅप आजच भरून काढली पाहिजे का ?

कांचन : सोळा वर्षांत तुम्ही काय केलंत याबद्दल आपण नाही बोललं तरी चालेल. तो काळा कालखंड आपण

काली० : हे बघ. तू पुन: पुन्हा मला गुन्हेगार समजून बोलणार असशील तर आपण न बोललेलंच बरं. नीट काय बोलायचं असेल ते बोल.

कांचन : ओ. के. म्हणजे तुम्ही सोळा वर्षापूर्वी आम्हाला टाकून पळून गेलात...

काली० : कांचन ?

कांचन : पळून गेलात असं म्हणायचं नाही, तर एक अस्वस्थ आत्मा सत्याच्या शोधा-साठी घराबाहेर पडला—असंच म्हणायचं ना ?

कालीο : ( थंडपणे ) अच्छा ! ( उठतो ) उद्या सकाळी बोलू आपण !

कांचन : उद्या सकाळी ? कसं शक्य आहे ? सकाळी मला मुळीच वेळ नाही.

कालीο : म्हणजे ?

कांचन : मला सकाळी लौकर उठून कामाला लागायचंय.

कालीο : मुंबईत कसलं काम आलंय तुला ?

कांचन : अहो, असं काय करता ? मी सकाळी लौकर उठून बाहेर पडले, तर नवे टॅलंट शोधायला एखाद्या असिस्टंट डायरेक्टरची आणि माझी भेट होण्याची शक्यता आहे. नंतर सगळे बिझी होतात. मग त्यांची भेट होत नाही असं ऐकलंय मी.

कालीο : तुला काय वाटतं ? सकाळी सात वाजता हे असिस्टंट डायरेक्टर लोक घोड-बंदर रोडवर, हिरॉइनसाठी दुर्बिणी लावून बसतात ? पोरी, हिंदी पिक्चरमध्ये हिरॉइन होण्याचं वेड तू डोक्यातून काढून टाक. तो मूर्खपणा आहे.

कांचन : का पण ?

कालीο : तुझ्यासारख्या हिरॉइन बनण्याचं वेड डोक्यात घेऊन मुंबईत आलेल्या शेकडो मुली आयुष्यातून उठल्या आहेत. चित्रपट व्यवसाय हे रुपेरी मायाजाल आहे, त्यात तू फसू नयेस. चित्रपटवाले हे स्वप्नांचे सौदागर आहेत. लोकांना गुंगवणारी स्वप्नं तयार करून विकतात. तिथं तत्त्वं, जीवनमूल्यं, निष्ठा, श्रद्धा यांचा लिलाव होतो भावना, माणुसकी यांचं नोटांच्या पुडक्याखाली दफन होतं, हे सगळं मी जवळून पाहिलं आहे. म्हणून सांगतो पोरी, हे वेड डोक्यातून काढून टाक.

कांचन : हे पहा डॅडी, तुमच्याशी बोलताना चिडायचं नाही असा मी येताना निर्धार केला आहे. म्हणून न चिडता तुम्हाला सांगते की, माझ्या आयुष्याशी तुमचा संबंध येतोच कुठं ? इथं माझं काही जमलं नाही तर चार-आठ दिवसांनी परत जाईन. तुम्ही सगळं विसरून तुमच्या वाटेनं चालू लागाऊ. आम्ही आमच्या आयुष्याचं ओझं डोक्यावर घेऊन आमच्या मार्गानं चालायला लागू. मी माझ्या गच्चीवर उभी राहून माझा पतंग आकाशात सोडते आहे, तेव्हा तुम्ही लांबच्या गच्चीवरून ‘ तसा मांजा खेच, अशी ढील दे ’ अशा सूचना देण्याची गरज नाही.

कालीο : ठीक आहे. तुला तुझं आयुष्य वाट्टेल तसं उधळूनच टाकायचं असेल तर मी काय सांगणार वा करणार ? ( तळमळीनं ) अगं पोटची पोर आहेस, म्हणून मन कळवळून येतं ग. आयुष्याच्या सुरुवातीलाच निराशेनं संपूर्ण जीवन व्यापून टाकलं तर आयुष्याची फोलपटं होतात !

कांचन : माझ्या दृष्टीनं काहीही फरक पडत नाही. माझ्या कुठल्या इच्छा आजपर्यंत पुऱ्या झालेल्या आहेत? मला खूप श्रीमंत व्हायचं होतं — नाही झाले. मला नर्तिका व्हायचं होतं—नाही झाले. मला बापाची खूप लाडकी लेक व्हायचं होतं—नाही झाले.

काली० : (भारावून तिच्याकडे पाहतो) इकडं ये. (कांचन जवळ जाते पण थोड्या अंतरावर उभी राहते.) हे बघ, आज सकाळी रागाच्या भरात मी जे बोललो असेन ते विसरून जा. मी सकाळी तुझं नीट स्वागत केलं नाही. मी भडकून बोललो, सॉरी. जवळ ये बेटी. लेक म्हणून बापाजवळ ये. आशीर्वादाच्या फुलांची परडी तुझ्यावर उधळू दे मला. (तिच्या डोक्यावर मायेनं हात ठेवतो) माय लिटल् गर्ल! (ती तोंड फिरवते) काय झालं बेटी?

कांचन : (मुद्दाम आव आणून) काही नाही. जरा गळा दाटून आला सवय नाही न बापाची माया झेलायची!

काली० : आता कसलाही विचार करायचा नाही. मजेत झोपायचं. उद्या सकाळी लौकर उठून मी तुझ्यासाठी फर्स्टक्लास आम्लेट बनवीन.

कांचन : डॅडी, तुम्हाला रात्री लौकर झोप लागत नाही ना? मग तुम्ही सकाळी लवकर उठू नका. मीच बनवीन आम्लेट तुमच्यासाठी.

काली० : नो...नो...नो.. ! यू आर माय लिटल गेस्ट. अच्छा, आता जाऊ मी झोपायला?

कांचन : बल्ल्याचा फोटो नाही बघायचा तुम्हाला? तुमचा बळवंत कसा दिसतो हे पाहावसं नाही वाटत तुम्हाला?

काली० : का नाही? जरूर वाटतं पण तुझ्याजवळ त्याचा फोटो असेल याची कल्पना नव्हती मला.

कांचन : बसा नं इथं.

(कालीदास कांचनजवळ सोफ्यावर बसतो. ती त्याच्याजवळ सरकते. कालीदासकडं बघत राहते.)

काली० : एवढं काय बघतेस बेटी?

कांचन : माझ्या डोळ्यापुढं तुमचं चित्र होतं ते अगदी वेगळं होतं. रुबाबदार दाढी-मिशा, सोनेरी फ्रेमचा चष्मा, तोंडात पाइप. तुम्ही हार्मोनियम वाजवताय, ह्यातच धुंद झाला आहात...

काली० : तू फोटो दाखवतेस ना?

कांचन : (भानावर येऊन) हो....हो. ..दाखवते ना! (सॅकमधून दोनतीन फोटो काढते. एक दाखवीत) हा बघा बल्ल्याचा—नव्हे तुमच्या बळवंतचा फोटो.

काली० : (फोटो हातात घेऊन) व्हेरी नाइस बॉय. झकास आहे पोरगा.

कांचन : तुमच्यासारखाच दिसतो नाही ? बघा ना...हनुवटी, ओठ.
कालीदास : यू आर राइट.
कांचन : ( दुसरा फोटो दाखवते ) ही मम्मी ! ओळखलंत ?
कालीदास : न ओळखायला काय झालं ? सकाळी दाखवलाच होतास तिचा फोटो.
कांचन : सकाळचा जुना होता, हा अलिकडचा आहे.
कालीदास : तशी फारशी ती बदललेली नाही; पण जरा रोडावलेली दिसते.
कांचन : तिचं रोडावणं सीझनल असतं. पेपर तपासायचं काम सुरू झालं की ती रोडावते. शाळेला सुट्टी पडली की ती सुधारते. ( तिसरा फोटो दाखवते ) ही आजी.
कालीदास : फारच अशक्त दिसते.
कांचन : तिला अशक्त व्हावंच लागलं ना ! कारण हा फोटो काढल्यानंतर दोनच महिन्यांनी तिला स्मशानात जावं लागलं ना ! आज तुम्हाला फोटो दाखवला ना तिचा ? ती आज रात्री बहुतेक बोलायला येणार माझ्याशी.
कालीदास : पण तुझ्या आजीला घरात फिरायची सवय नाही ना ? नाहीतर सकाळी लेकीचा अध्याय झाला—रात्री सासू उशाशी बसायची. अच्छा ! गुड नाइट ! ( जायला लागतो. )
कांचन : हे काय डॅडी ? तुम्ही झोपायला चाललात ?
( कालीदास बेडरूममधे जातो. कांचन रॅकमधून एक पुस्तक काढते. मध्यभागी येऊन मोठ्यानं नाटकीपणे वाचू लागते. )
कांचन : हाय रे दुर्भाग्या ! पतितपावन म्हणविणाऱ्या परमेश्वरानं तुझ्या पापांकडं पाठ फिरवून पवित्र असा अमृतकुंभ तुझ्या हाती दिला. पण तू कुंभाराच्या बुद्धीनं त्याला केवळ मृत्कुंभ समजून लवंडून टाकलास ? हर.... हर... ! अरे कमनशिब्या, देवानं सीतेसारखी सुंदर, सात्विक, सौभाग्यवती सकाळ-संध्याकाळ तुझ्या सेवेला दिली असताना, तुवा पाप्यानं पतिव्रतेला पतिता ठरवून पायानं ठोकरलंस ? धिःक्कार .. धिःक्कार असो तुझा !
( दरम्यान कालीदास बाहेर येऊन तिच्या मागे उभा राहून ऐकतो. )
कालीदास : तुझ्या आजीशी बोलतेस ?
कांचन : नाही. पतिव्रतेचा प्रभाव या नाटकातले संवाद म्हणत होते. तुम्ही नको म्हणत असाल तर मी बंद करते.
कालीदास तू संवाद म्हटलेस तर माझी हरकत नाही, पण एवढंच सांग. हे नाटक किती तासांचं आहे ?
कांचन : तीन तास दहा मिनिटं.
कालीदास : बाप रे !
कांचन : घाबरू नका. सबंध नाटक म्हणणार नाही मी.

कालीο : ( बाहेर येतो ) मग हरकत नाही--

कांचन : तुम्ही खुशाल झोपा--

कालीο : ( सोफ्यावर बसतो ) आज मला झोप येईलसं वाटत नाही.

कांचन : मी तर झोप उडवली नाही ना तुमची ?

कालीο : ( तिच्या खवचटपणाकडे दुर्लक्ष करून ) आज सगळा दिवसच वेगळा गेला. मनाला स्वस्थता अशी मिळालीच नाही चालायचंच. असं होतं कधी कधी... समुद्राच्या पोटात खूप उलटे सुलटे प्रवाह वाहात असले तरी, समुद्राला वरून शांतच राहावं लागतं. जाने दो...बेटी, ती शेल्फमधली रमची बाटली देतेस ?

कांचन : देते; पण डॅडी तुम्ही नेहमी जाम पिता असं ऐकलं आहे. तसं नाही हं प्यायचं. माझ्यासाठी एवढं कराल ?

( बाटली व ग्लास आणते. किचनमधून पाण्याची बाटली आणते. कालीदास ड्रिंक बनवू लागतो. )

कालीο : अग, मला अगदी एकटं वाटतं तेव्हा जास्त पितो. आज तू आहेस सोबतीला पाहुणी म्हणून...तेव्हा तशी भीती बाळगू नकोस. ( सिप घेतो. क्षणभर कुणीही बोलत नाही. कालीदास बोलावं की न बोलावं असा विचार करून ) बेटी, मी तुझ्या आईला सोडून का गेलो हे विचारावसं वाटलं नाही तुला ?

कांचन : एकदा वाटलं होतं तसं दुपारी. पण मग वाटलं तुम्हाला ते आवडायचं नाही. तुम्ही भडकाल आणि दुसरं म्हणजे, आता इतक्या वर्षांनी कळून काय फरक पडणार आहे ?

कालीο : खरं सांगू तुला ?

कांचन : खोटं सांगितलंत तरी मी ऐकून घेईन.

कालीο : रात्रीसुद्धा तुझी जीभ विश्रांती घेत नाही ?

कांचन : हं.. सांगा ..

कालीο : तर शामला, म्हणजे तुझी ममी मला अजिबात आवडत नव्हती.

कांचन : तरीही दोन मुलांना जन्म दिलात तुम्ही ?

कालीο : (तीव्रतेनं) कांचन—

कांचन : सॉरी... सांगा.

कालीο : विशिष्ट परिस्थितीत मला तिच्याशी लग्न करावं लागलं. ती स्वयंपाक चांगला करीत नव्हती तरी ती कर्तव्यदक्ष गृहिणी होती, प्रेमळ माता होती. पण देअर वॉज नॉट एनी फन इन हर....फन...! कळलं का तुला मी काय म्हणतोय ते !

कांचन : हो... कळतंय मला— मी पुष्कळ फनफेअरमध्ये भाग घेतला होता !

कालीं० : बेटी, लहान आहेस अजून. जाऊ दे ते. तर मी काय सांगत होतो - तुझी मम्मी— तिच्याजवळ रसिकता नावाची गोष्टच नव्हती. मला वाटतं देव-देवतांच्या दगडात ती रुतलेली असल्यामुळं, संगीताचा वासही तिला सोसत नव्हता. अग मित्रांची मैफल बसल्यावर माझ्या गाण्याला अन् हास्य-विनोदाला बहर यायचा. घर दणाणून जायचं. पण ह्या बाईच्या चेहेऱ्यावर कंटाळ्या-शिवाय दुसरी प्रतिक्रिया दिसायची नाही. मैफल भर रंगात आली असताना, ही तुझी मम्मी शांतपणे व गंभीरपणे मला येऊन विचारायची— 'तुमचा दंगा आणि ओरडणं संपलं असेल तर जेवायला चला!'— ऐकतेस ना तू? माझ्या गाण्याला ती ओरडणं.. ओरडणं म्हणायची!

कांचन : त्यात तिचं काही चुकलं असं वाटत नाही मला— तुम्ही तिच्या धार्मिक श्रद्धेला दगड म्हणता—

कालीं० : तू माझा एक शब्द खाली पडू देऊ नकोस— (पुन्हा शांत होऊन) तरीही पाच वर्षं मी तिच्या संगीतशून्य संगतीत काढली. वाटलं, हळुहळू सुधारेल; पण तिच्या स्वैपाकात जशी सुधारणा झाली नाही, तशी तिच्या स्वभावातही झाली नाही. मला उबग आला. कोंडमारा असह्य झाला. आयुष्याची चव उडाली. अग, बायको अशी असावी की नवऱ्याला फक्त बायकोसाठी जगावं असं वाटलं पाहिजे. ती तशी नसेल तर मग तो इतर बायकांसाठी जगू लागतो.

कांचन : म्हणजे पुरुषांना मुलांसाठी जगावंसं वाटत नाही?

कालीं० : तू पुन्हा--

कांचन : सॉरी फॉर द ब्रेक--

कालीं० : म्हणून मला वाटलं आपण आयुष्य झोकून दिलं तरच आपण मोठं काही करू शकू. मी तुझ्या मम्मीला स्पष्टपणे सांगितलं, 'मी आता इथं राहू शकत नाही.' आणि मी घर सोडलं, यात काय चुकलं माझं?

कांचन : फरक एवढाच आहे डॅडी, की माझ्या मम्मीनं नवरा मनासारखा मिळाला नाही म्हणून ती मुलांना सोडून गेली नाही. तिचं मुलांवर प्रेम होतं.

कालीं० : (गडबडतो; पण सावरुन घेतो.) माझंही तुझ्यावर व बळवंतवर खूप प्रेम होतं.

कांचन : (टाळ्या वाजवते) असे बघू नका--वाक्य दाद देण्यासारखं होतं म्हणून टाळी दिली.

कालीं० : (काहीसं चिडून) थट्टा करू नकोस. खरं तेच सांगतोय तुला.

कांचन : एवढं प्रेम होतं तर एखादं तरी पत्र लिहिलं असतंत तुम्ही मला...मी ते दागिन्याप्रमाणं जपून ठेवलं असतं. तुमचे सगळे फोटोसुद्धा मम्मीनं जाळून टाकले.

कालीं० : (आश्चर्यानं) जाळून टाकले?

कांचन : मग काय तिनं तुमच्या फोटोची रोज पूजा करायला हवी होती ? तिला आजुबाजूच्या लोकांकडून वाटेल ते ऐकून घ्यावं लागायचं. तिला जिणं किती असह्य झालं होतं, याची तुम्हाला काय कल्पना ? तिचं सोडा, पण शाळेत इतर मुलामुलींचे वडील आले की आम्हाला किती चोरट्यासारखे वाटायचं माहीत आहे ? आणि म्हणे तुमच्यावर खूप प्रेम होतं !

काली- : सॉरी !

कांचन : तुम्हाला आमचा फोटोसुद्धा जवळ ठेवावासा वाटला नाही-- ?

काली० : जरा थांब ( उठून शेल्फमधून एक पुस्तक काढतो. त्यातून फोटो काढून तिला दाखवतो. )

कांचन : ( फोटो पाहून ) अय्या ! मी आणि बल्ल्या ?

काली० : हां...तू अडीच वर्षांची आणि बळवंत सहा महिन्यांचा होता.

कांचन : ( तिरकसपणे ) फोटो ठेवलात; पण पुस्तकात लपवून—फ्रेममध्ये घालून भिंती-वर लावायची लाज वाटली असेल तुम्हाला ?

काली० : ( फोटो पुन्हा पुस्तकात ठेवून ) तुला सरळपणे काही सांगण्याची सोयच नाही. मी पुन्हा सांगतो, मला माझ्या मनासारखं जगायचं होतं—ते मी केलं. त्यासाठी जे जे सोसावं लागलं, ते ते मी सोसलं—त्याचा मला पश्चात्ताप नाही.

कांचन : सोसलं तुम्ही पण भोगलं आम्ही ! तुमचं मम्मीशी पटलं नाही, याची शिक्षा मला अन् बल्ल्याला ? तरीही तुम्हाला पश्चात्ताप नाही ? तुमचं काळीज खरो-खरच बुरुजासारखं भक्कम असलं पाहिजे.

काली० : कांचन—तू पुन्हा भांडण काढणार आहेस काय ?

कांचन : अजिबात नाही. आताचे आपले संवाद आपण इरेज करून टाकू या—मला सांगा, तुम्ही पुन्हा लग्न केलंच नाही ?

काली० : केलं. जाहिरातीसाठी मॉडेलिंग करणारी आणि चित्रपटात येऊ इच्छिणारी एक स्त्री होती... उर्वशी !

कांचन : वॉज शी एनी फन ?

काली० : शी वॉज फनी. तुझी मम्मी अजिबात हसायची नाही. तर ही बाई सारखी हसतच असायची. मी काहीही बोललो तरी हसायची. काहीही नाही बोललो तरी हसायची.

कांचन : फारच छान !

काली० : तिचा बापसुद्धा हसता हसता हार्टफेल होऊन मेला होता म्हणे !

कांचन : ( गंभीरपणे काळजीने ) पण तुम्ही तिच्याबरोबर फार हसत नव्हता ना ?

काली० : अग, तिच्या एका मैत्रिणीची मावशी मेली, तेव्हा ही तिला भेटायला गेली आणि तिला काय म्हणाली माहीत आहे ?

कांचन : काय ?

काली० : म्हणाली, 'दे टाळी --माझी पण मावशी नुकतीच मेली!' आणि हसायला लागली.

कांचन : तुमचा संसार हास्यानं तुडुंब भरून गेला असेल नाही ?

काली० : अग ती हसत होती; पण मी रडत होतो पहिल्या वर्षात तिनं कपडे, दाग-दागिने, सेंटस, प्रसाधनं यासाठी हसत हसत वीस हजार रुपये खर्च केले. दुसऱ्या वर्षात पंचवीस हजार उडवले आणि तिसऱ्या वर्षात पहिल्या सहा महिन्यात बावीस हजारांची चटणी केली.

कांचन : ती चटकदार होती ?

काली० : कोण ? उर्वशी ?

कांचन : नाही चटणी!... पुढं सांगा ना खमंग कहाणी.

काली० : कांचन, बी सीरियस!

कांचन : ओ. के. आय ॲम कम्प्लीटली सीरियस—

काली० : तर मी तिला उधळपट्टीबद्दल खडसावून विचारलं— पण मला उत्तर न देता, हसत हसत एका आर्ट डायरेक्टरचा हात धरून पळून गेली.

कांचन : मग काय केलंत तुम्ही ?

काली० : काय करणार ? सपाटून दारू प्यायला लागलो. एक वर्ष दारूत बुडवून टाकलं. त्या वर्षी एकाही चित्रपटाचं संगीत केलं नाही. अग उत्साहानं मांडलेला संसार उद्ध्वस्त होणं म्हणजे काय यातना असतात—

कांचन : त्या मला माहीत आहेत. कारण मीसुद्धा अशा उद्ध्वस्त झालेल्या संसारातच वाढले आहे. पुढं सांगा—

काली० : नंतर आणखी एक लग्न केलं. पण तेही फसलं.

कांचन : गाढवपणा हा माणसाचा जन्मजात गुण असावा नाही ?

काली० : कांचन, तू मला गाढव म्हणतेस ?

कांचन : छे छे... ! त्या दोन्ही बायकांच्या गाढवपणाबद्दल बोलले मी. मग आता यामिनीबाईशी केव्हा लग्न करणार आहात ?

काली० : तू फालतू चौकशा करू नकोस !

कांचन : पण तुम्ही लग्न करूच नका. कारण तुम्हाला लग्न ही गोष्ट मानवणारी नाही. बाय द वे—यामिनीबाईंनीसुद्धा तुमच्याप्रमाणं आपल्या मुली सोडल्या आहेत ?

काली० : तुझा आगाऊपणा बंद करशील ?

कांचन : सॉरी... तुम्ही तुमची खासगी हकिगत सांगितलीत याबद्दल आभारी आहे. शिवाय आपली चूक कबूल केल्यानं मनही हलकं होतं.

कालीο : कसली चूक ? उगाच चुकांचं गाठोडं माझ्या गळ्यात बांधू नकोस. मी कुणाचा खून केला नाही की चोरी केली नाही. तुम्हाला सोडून गेलो; पण नंतर तुझ्या मम्मीला मदत म्हणून पाच हजार रुपये पाठविले होते. पण तुझी मम्मी स्वाभिमानी पडली ना ! तिनं ते पैसे नाकारले—

कांचन : का घ्यावेत तिनं ते पैसे ? दया म्हणून, भीक म्हणून, की उपकार म्हणून ? तुम्ही आत्ता म्हणालात मी कुणाचा खून केला ? म्हणून—

कालीο : हो—खरं तेच सांगितलं.

कांचन : तुम्ही माणसाचा खून केला नसेल; पण तुम्ही मम्मीच्या संसाराचा खून केलात. आमच्या बालपणाची हत्या केलीत, आणि आमच्यावर माया करणाऱ्या बापाचा गळा दाबलात. कशासाठी ? स्वार्थासाठी लौकिक मिळवण्यासाठी— शेवटी काय मिळवलंत ? थोडंसं नाव आणि हे भकास, भरकटलेलं अस्थिर जीवन ! तुम्ही संगीत दिग्दर्शक म्हणवता स्वतःला, पण तुम्हाला जीवनाचा सूर आणि भावनांचा ताल सापडलाच नाही.

( कालीदास अस्वस्थ होतो. उठतो आणि आपल्या बेडरूममध्ये जातो. बेडरूमचं दार लावून घेतो. कांचन दिवाणखान्यातले सर्व दिवे मालवते. फक्त एक दिवा ठेवते. आपल्या बॅगमधून वही काढते सोफ्यावर बसते व शांतपणे कविता म्हणते. )

आधार बोट जेव्हा सोडून दूर गेले
संपूर्ण बाल्य माझे पुरते अनाथ झाले
माझेच तात कैसे परक्यासमान झाले
हे गीत जीवनाचे बेसूर होत गेले

( कालीदास हळूच बेडरूमचे दार उघडतो. दारात उभा राहतो. कांचनचे त्याच्याकडे अजिबात लक्ष नाही. कालीदास अश्रू लपवण्यासाठी गॅलरीत वळतो. बाहेर पाहतो. )

( अंक १ ला समाप्त )

□

# अंक दुसरा

♡

## ( प्रवेश पहिला )

[ कालीदासच्या बंगल्यातील पंधरा दिवसानंतरची सकाळ. गेले पंधरा दिवस कांचन इथंच राहिली आहे. तिनं बंगल्याची किरकोळ दुरुस्ती करवून घेतली आहे. भिंतींचा रंगही बदलला आहे. दारांना छान पडदे लावले आहेत. सोफासेटची कव्हर्सही बदललेली आहेत. फर्निचरची मांडणीही वेगळी केली आहे. टेबल-खुर्ची मात्र आहे तिथंच आहे. श्रीदेवीचा एक मोठा फोटो ती भिंतीवर लावत असताना पडदा उघडतो. फोटो व्यवस्थित बसला आहे याची खात्री करून घेऊन टेबलापाशी जाते. लेटर पॅड व बॉलपेन घेते आणि पत्र लिहायला बसते. तेवढ्यात बेल वाजते. उठून दार उघडते. यामिनी आलेली आहे. ]

कांचन : येस ?

यामिनी : हा ऽ य ! ( आत येते )

कांचन : कोण पाहिजे आपल्याला ?

यामिनी : ( घरावरून नजर फिरवते ) मला वाटतं हेच घर असावं.

कांचन : हे घर आहे; पण हेच घर म्हणजे कळलं नाही मला ?

यामिनी : कालीदास कान्हेरे इथंच राहतात ना ?

कांचन : ऑफकोर्स ! ( दोघीही हसतात. )

यामिनी : ओळखता येणार नाही इतका बदल झालाय ?

कांचन : माझ्यात ?

यामिनी : नाही, या घरात. मी क्षणभर संभ्रमात पडले. कालीदासचंच का घर हे ?

कांचन : यामिनीबाई, खरं सांगू ? हे घर आणि या घरात राहणारा माझा बाप— दोघांचेही रंग उडाले होते. पण घराला रंग देणं माझ्या हातात होतं. देऊन टाकला.

यामिनी : कालीदास आला नाही अजून पुण्याहून ? आठ-दहा दिवस तरी झाले त्याला जाऊन.

कांचन : पण ते केव्हाही येतील. का ?

यामिनी : मला वाटलं आतापर्यंत आला असेल म्हणून मी आले.

कांचन : पण मी आहे ना ? गप्पा मारायला मी चालणार नाही का ?

यामिनी : तसं काहीही नाही. मी गप्पा मारायच्या मूडमधेही नाही. पण तुझं काय चाललंय ?

कांचन : काही नाही. मम्मीला पत्र लिहितेय.

यामिनी : माझ्याबद्दल काही लिहिलंस ?

कांचन : अजिबात नाही. अहो, एका हलवायाच्या दुकानात गेल्यावर दुसऱ्या हलवायाच्या मालाची तारीफ करायची नसते, हे कळतं मला.

यामिनी : यू आर व्हेरी क्लेव्हर.

कांचन : नॉट क्लेव्हर बट प्रॅक्टिकल. बाय द वे...नंदकुमार कोण आहेत ?

यामिनी : फार मोठा कॅमेरामन आहे; आणि माझा चांगला मित्र आहे. का ग ?

कांचन : काही नाही, सहज. नाव ऐकलं, विचारलं. एनी ऑब्जेक्शन ?

यामिनी : नॉट ॲट ऑल. तुझी नजर मात्र तीक्ष्ण आहे एवढंच म्हणायचंय मला

कांचन : शक्य आहे. सवय आहे ना मला ! काही आकडे दिसले की त्यांची बेरीज करायची—कधी वजाबाकी तर कधी गुणाकार.

यामिनी : दॅटस ऑल राइट ! मला आता निघालं पाहिजे. मी कालीदासला एवढंच सांगायला आले होते की आज संध्याकाळी जमलं तर येईन, नाही तर फोन करीन. आज मी खूप बिझी आहे आणि शिवाय धाकटीला बरं नाही.

कांचन : मी तुमचा निरोप जरूर सांगीन. डोण्ट वरी. यामिनीबाई, मी तशी लहान आहे अजून; पण एक सांगते, कानापेक्षा डोळ्यावर जास्त विश्वास ठेवा. सूर हवेत फिरतात. कॅमेरा जमिनीवर असतो. बाय बाय ! ( यामिनी काहीशी चक्रावून निघून जाते. कांचन पुन्हा पत्राकडे वळते. स्वतःशीच ) बल्ल्याची मस्तपैकी फिरकी घेतली पाहिजे. काय लिहावं त्याला ? ( एकदम खूष होऊन ) आयडिया. ( बॉलपेन हातात घेते. तेवढ्यात डोअरबेल वाजते. कालीदास हातात सूटकेस घेऊन आलेला आहे. कांचन खुर्चीवरून उठता उठता स्वतःशीच ) माझ्या सगळ्या शत्रूंनी आज कट केलेला दिसतोय मला पत्र लिहू न देण्याचा. ( दाराकडे पाहून ) आले...आले... ! ( जाऊन दार उघडते ) वेलकम डिअर फादर ! वेलकम !

(कालीदास आत येतो आणि घराच्या बदललेल्या स्वरूपाकडे बघतच राहतो.)

काली० : हे माझंच घर आहे ना ?

कांचन : व्हॉट डू यू मीन ?

काली० : घराचा रंग एकदम बदलून टाकलास तू !

कांचन : मिस्टर कालीदास कान्हेरे, तुमच्या घराला रंगच नव्हता. पहिला रंग केव्हाच उडाला होता.

काली० : असं तुला वाटतं; पण कांचन एक लक्षात ठेव. ह्या कालीदास कान्हेरेच्या घराचा काय किंवा आयुष्याचा काय, रंग फिका झाला असेल; पण तो न ओळखता येण्याइतका उडालेला नाही.

कांचन : ओ. के., ओ. के., ओ. के. पण बाथरूममध्ये बेतानं जा. तिथला रंग अजून ओला आहे.

काली० : म्हणजे ! घरात सगळीकडं रंग दिलास का काय तू ?

कांचन : येस. फक्त तुमचा टूथब्रश व टूथपेस्ट सोडून. आतला माळाही साफ करून टाकला. रद्दी, डबे अन् बाटल्या मागच्या गॅरेजमध्ये ठेवलेल्या आहेत. नंतर विकून टाकू. मला सांगा, आता घर कसं वाटतं ? हॅपी होम वाटतं की नाही ? नीटनेटकं, स्वच्छ—

काली० : या आधी देखील काशीबाई घर स्वच्छ करीत होती. यामिनी देखभाल करीत होती...

कांचन : हो—पण काशीबाई पगाराच्या प्रमाणात घरातला कचरा काढीत होती आणि यामिनीबाई, सॉरी टू से दॅट— फक्त बेडरूमची काळजी घेत होत्या.

काली० : ( तीव्रतेनं ) कांचन, माझ्या मोकळेपणाचा तू जास्त फायदा घेऊ नकोस. या घरात कोण काय करतं, याची मला पूर्ण कल्पना आहे. तू सांगायची गरज नाही.

कांचन : जाने दो—तुमच्या स्वागताच्या शब्दांच्या तोफा उडवण्यात गम्मत नाही. तुमची गाडी व्यवस्थित चालली का ?

काली० : एकदम फर्स्टक्लास ! पुणे-मुंबई प्रवासात ती एकदाही खोकली नाही तुझ्या आजीसारखी. ( टेबलाकडे लक्ष जाऊन ) काय लिहिते आहेस तू ?

कांचन : मी पत्र लिहितेय मम्मीला अन् बल्ल्याला. ( खुर्चीवर जाऊन बसते ) डॅडी, बल्ल्याला तुमचा आशीर्वाद लिहू ?

काली० : हां...जरूर जरूर लिही

कांचन : गुड. अन् मम्मीला ?

काली० : तिचा काय संबंध !

कांचन : संबंध म्हणून नाही; पण बल्ल्याला आशीर्वाद लिहिल्यावर मम्मीला काहीच नाही लिहिलं, तर वाईट दिसेल आणि वाईट वाटेल ना तिला !

काली० : ठीक आहे. लिही- ‘ तू मजेत असशीलच ’.

कांचन : बस, इतकंच ? दुसरं काहीतरी सांगा. कारण ती मजेत न माहीत आहे.

काली० : मग लिही, 'तुझं कुशल आहे ना !'

कांचन : हे फारच औपचारिक वाटतं.

काली० : ( भडकून ) मग काय — मी सोळा वर्षांपूर्वी तुम्हाला सोडून गेलो हा आयुष्यातला सगळ्यात मोठा गाढवपणा होता. तो विसरून मला क्षमा कर— तरच माझ्या आत्म्याला शांती मिळेल ! —असं लिहायला सांगू ?

कांचन : तुम्ही एवढे रागावता कशाला ? तुम्हाला तिची पर्वा नसेल; पण माझं तिचं नातं मायलेकीचं आहे. गेली एकोणीस वर्षे ती माझ्यावर फक्त मायाच करीत आलेली आहे. तिच्याकडं पाहण्याचा माझ्या आणि तुमच्या दृष्टिकोनात फरक आहे.

काली० : ऑल राइट ! ऑल राइट ! ( शांत होतो ) सॉरी. लिही, 'तू मुलांचा चांगल्या रीतीनं सांभाळ केला आहेस. आईचं कर्तव्य उत्तम प्रकारे पार पाडलं आहेस.'

कांचन : हे कसं छान वाटतं ? ह्याच्यापुढं लिहू — 'याबद्दल मला तुझा अभिमान वाटतो'—

काली० : मला अभिमान वगैरे काहीही वाटत नाही. तू उगाच मला तिच्या जाळ्यात ढकलण्याचा प्रयत्न करू नकोस

कांचन : पण मुलांचासुद्धा अभिमान वाटत नाही तुम्हाला ?

काली० : कांचन, तू शब्दांना फाटे फोडू नकोस.

कांचन : राहिलं. पण एवढ्यानंसुद्धा तिला खूप बरं वाटेल. मला असं लिहायल सुचलं नसतं. पण तुम्हाला सिनेमातले खोटे संवाद ऐकून ऐकून पाठ झालेत ना, त्यामुळं जमतं.

काली० : ( काहीसा चिडून ) मी आता म्हणालो ते मनापासून म्हणालो, तू मला सारखं डिवचू नकोस.

कांचन : तुम्ही मनापासून म्हणालात याचा मला आनंद झाला. मम्मीला तर आभाळाएवढा आनंद होईल. आता फक्त या मजकुराखाली तुम्ही सही तेवढी करा. नाही तर मम्मीला वाटेल मीच काही तरी खोटं खोटं लिहिलंय म्हणून.

काली० : ( रागाने ) मला....मला सही करायला सांगतेस तिच्या पत्रावर ? तुझं डोकं ठिकाणावर आहे का ?

कांचन : (शांतपणे) पण डॅडी, तुम्ही तिला एक प्रकारे सर्टिफिकेटच नाही का दिलंत? मग तुमची सही असल्याशिवाय ते खरं वाटणार नाही. प्लीज डॅडी, माझी ही छोटीशी मागणी आहे. (कालीदास अस्वस्थ होतो. पण सही करण्याच्या दृष्टीने काहीही हालचाल करीत नाही.) करायची नसेल तर नका करू सही. माझी सक्ती नाही. (भडकते) उभं आयुष्य तिनं उन्हात काढलं. दोन धीराचे शब्दसुद्धा द्यायची दानत नाही तुमची? तिला केवढा आधार वाटेल या चार शब्दांनी? पण नाही. तुम्ही हट्टीपणानं दुसऱ्याच्या मनात उगवणारा आनंदसुद्धा चिरडून टाकता आहात.

काली० : एका मामुली सहीसाठी एवढं भाषण करायची गरज नाही. आण ते पत्र इकडं.

(कांचन पत्राचा कागद व बॉलपेन पुढं करते. कालीदास करायची म्हणून त्यावर सही करतो. कांचन खूष होते.)

कांचन : थँक्यू डॅडी ...! थँक्यू वेरी मच! खरंच तुम्ही खूप चांगले आहात. भडकत तरी आवडता मला. ते जाऊ दे. मला सांगा, तुमची पुण्यातली मीटींग कशी झाली?

काली० : असल्या मीटींग्जकडं लक्ष द्यायचं नसतं. पुण्यातली हवा मात्र मस्त होती. असं थंड वाटत होतं. तब्येत एकदम खूष झाली.

कांचन : याचा अर्थ तुमचे ट्यून्स पुन्हा रिजेक्ट झाले, असंच ना?

काली० : कशावरुन म्हणतेस?

कांचन : तुमचा विषय बदलण्यावरनं आणि आवाजावरनं.

काली० : तू फक्त गेले पंधरा दिवस माझा आवाज ऐकतेस. तेवढ्यावरून तुला माझ्या आवाजातला फरक कळला?

कांचन : डॅडी, पूर्वीच्या बायका शितावरून भाताची परीक्षा करायच्या. आम्ही आजच्या मुली, शितावरून तांदळाची जात ओळखतो. मला खरं सांगा.

काली० : माझे ट्यून्स रिजेक्ट झाले नाहीत, कारण मी ह्या मीटींगला गेलोच नाही. रेसला गेलो, हरलो आणि परत आलो.

कांचन : डॅडी, तुम्ही मीटींगमध्ये जाऊन नुसते ट्यून्स ऐकवून यायला पाहिजे होतं.

काली० : दहा वर्षांपूर्वी प्रोड्युसर लोकांची लाइन लागायची माझ्या बंगल्यापुढं. म्युझिक-साठी माझ्या गळ्यात पडायचे पण आता सगळा जमानाच बदलला आहे. आजकालची ही नवी पोरं, दारू पीत पीत ट्यून्स ऐकतात. बेधडक तोंडावर सांगतात, 'चाचा! मजा नहीं आया, और कुछ सुनाओ!' यांची लायकी नाही माझं संगीत घ्यायची. त्यापेक्षा घोड्यांच्या संगतीत वेळ मजेत जातो. (आत जाऊ लागतो.)

कांचन : मिस्टर कालीदास कानेरे, तुमचा आत्मविश्वास ढासळला आहे माझी आजी नेहमी म्हणते की, ज्याच्याजवळ आत्मविश्वास नाही, त्याच्यावर जगही विश्वास ठेवत नाही.

काली० : तुझी आजी मेल्यानंतरही इतकी बडबड करते ! कमाल आहे तिची ! तिला मरणोत्तर सुवर्णपदक किंवा पद्मश्री द्यायला पाहिजे. फरगेट इट. आज रात्री आपण ' चॉप्सी 'मधे जाऊ. फर्स्ट क्लास चायनीज फूड मिळतं तिथं. तू, मी अन् यामिनी.

कांचन : सॉरी, मी तुम्हाला सांगायचं विसरले. मघाशी यामिनीबाई येऊन गेल्या. त्यांनी निरोप दिलाय की त्या आज खूप बिझी असल्यामुळं त्या तुम्हाला आज भेटू शकणार नाहीत. जमलं तर फोन करतील आणि रात्री मी सुद्धा मोकळी नाही.

काली० : तू रात्री मोकळी नाहीस याचा अर्थ ?

कांचन : मला काम आहे रात्री

काली० : पुन्हा आज रात्री ? कांचन, इथं आल्यापासून तू तीन रात्री उशीरा परत आलीस माझ्या देखत !

कांचन : गुड गॉड ! तुमच्या लक्षात आलं हे ? थँक्स !

काली० : आलं म्हणजे ? मी बाप आहे तुझा. तू बेजबाबदारपणानं वागायला लागलीस तर मी मुळीच खपवून घेणार नाही. मी दारू पितो, रेसला जातो किंवा आणखी काय करतो; म्हणून तुला बेछूटपणे वागता यायचं नाही ! रात्र रात्र बाहेर राहतेस ती कशासाठी ?

कांचन : धंद्यासाठी.

काली० : मूर्ख पोरी, मुंबईत धंदा या शब्दाचा फार भयानक अर्थ होतो, हे माहीत नसेल तुला.

कांचन : म्हणजे माझ्या कामासाठी.

काली० : कसलं काम ?

कांचन : ते मला सांगता येणार नाही इतक्यात.

काली० : हे पाहा कांचन, तू माझ्या धंद्याबद्दल हजार प्रश्न विचारतेस; पण तुझ्या हालचालीबद्दल काहीही विचारायचं नाही याचा अर्थ काय ? तू अशी रात्री-अपरात्री भटकतेस, ही मुंबई आहे. उद्या काही भलतंसलतं झालं; तर तुझी मम्मी माझ्या डोक्यावर खापर फोडेल. एवढं मुलीला सांभाळता आलं नाही म्हणून माझा उद्धार करील. तेव्हा रात्री तू कुठं जातेस, कशासाठी जातेस व काय करतेस हे मला कळलंच पाहिजे.

कांचन : हे बघा, तुम्ही आत्ताच प्रवासाहून आला आहात. वॉश घ्या, फ्रेश व्हा— मग बोलू आपण.

कालीο : पण तुझी चलाखी माझ्यापुढं चालायची नाही एवढं मात्र लक्षात ठेव.
(कांचन कालीदासला आत ढकलते. कालीदास आत जातो. कांचन टेबला-पाशी जाऊन पत्र पुरे करते. पाकिटात घालते. जिभेनं पाकीट चिटकवते. पत्ता लिहिते. तेवढ्यात बेल वाजते. ती जाऊन दार उघडते. दारात नंदकुमार.)

कांचन : येस! कोण पाहिजे तुम्हाला?

नंदο : मे आय कम इन?

कांचन : ऑफकोर्स!

नंदο : (आत येतो) मी नंदकुमार.

कांचन : (उत्साहानं) व्हेरी ग्लॅड टू सी यू. तुम्ही ते नंदकुमार! तुम्हाला माहीत आहे? तुम्ही हँडसम आहात ते?

नंद : पण आपण?

कांचन : मी कांचन कालीदास कान्हेऱ्यांची मुलगी.

नंदο : तुम्हीही—

कांचन : तुम्ही वगैरे म्हणायची गरज नाही. तू म्हटलंत तरी चालेल— बरं वाटेल.

नंदο : ओ. के तूसुद्धा स्मार्ट आहेस हे माहीत आहे तुला?

कांचन : तुम्ही मोठे कॅमेरामन आहात ना?

नंदο : हे तुला कुणी सांगितलं?

कांचन : कुणीही सांगितलं तरी काय फरक पडतो?

नंदο : यू आर टॅलेंटेड गर्ल.

कांचन : तिथंच तर सगळी गोची आहे माझ्या वडलांना मी टॅलेन्टेड आहे असं वाटत नाही ना!

नंदο : कान्हेरेसाहेब आहेत घरात?

कांचन : आहेत बसा ना तुम्ही ते येतीलच इतक्यात.

नंदο : आणखी कुणी आहे?

कांचन : यामिनीबाई ना? नाहीत.

नंदο : हे नाव का घेतलंस तू?

कांचन : काही गोष्टी इंटयुइशननं समजतात मला.

नंदο : ओ. के.! मला गेलं पाहिजे.

कांचन : का? यामिनीबाईशिवाय दुसरं कुणीही बोलण्यासारखं नाही असं का वाटतं तुम्हाला?

नंदο : नाही—तसं मुळीच नाही.

कांचन : मग थोडं थांबा. माझं काम आहे तुमच्याकडं—

नंदο : माझ्याकडं?

कांचन : तुम्ही कॅमेरामन आहात ना ? मग माझ्याकडं बघा—
नंद० : तुझ्याकडं ?
कांचन : केवळ कॅमेरामनच्या दृष्टीनं माझा फेस फोटोजिनिक आहे का, आणि मला फिल्म लाइनमध्ये काही चान्स आहे का ? हे सांगाल ?
नंद० : ( उगाच कॅमेरा अँगलनं पाहिल्यासारखं करून ) तू सुंदर आहेस. कुणीही तुला हसत हसत चान्स देईल.
कांचन : खरं सांगता ? मग माझ्यासाठी वशिला लावाल ?
नंद० : व्हाय नॉट ?
कांचन : कॅमेरामनची शिफारस असली की सोपं होतं.
नंद० : पण हे काम तुझे डॅडीही करू शकतील.
कांचन : छेः छेः ! एक तर त्यांना तशी इच्छा नाही आणि मलासुद्धा त्यांची मदत नको आहे.
नंद० : मी जरूर मदत करीन तुला.
कांचन : यू आर सिम्प्ली ग्रेट ! तुम्ही मला चान्स द्याच. मला पडद्यावर पाहून माझे डॅडी भुईसपाट झाले पाहिजेत. थांबा हं. मी डॅडींना बोलावते. तुमची त्यांची ओळख असेल ना ?
नंद० : नाही. तसं नावानं ओळखतो मी त्यांना पण प्रत्यक्ष भेट झाली नाही कधी. मी फक्त यामिनीसाठी आलो होतो.
कांचन : यामिनीबाई काय नेहमीच्याच आहेत. आज चेंज म्हणून डॅडींना भेटा.
( कालीदास आतून बॉश घेऊन व घरगुती कपडे घालून येतो )
काली० : कोणाशी बोलते आहेस कांचन ?
कांचन : डॅडी, मी ओळख करून देते. हे मिस्टर नंदकुमार ( कालीदास जरा आश्चर्यचकित होतो; पण दाखवीत नाही. ) तुम्हाला धक्का तर नाही ना बसला ?
काली० : धक्का बसण्याचं कारणच काय ?
नंद० : नमस्ते !
काली० : ( विशेष लक्ष न देता ) नमस्ते !
नंद० : डॅडी, हे फार मोठे कॅमेरामन आहेत.
काली० : मला माहीत आहे.
कांचन : पण तुम्हाला माहीत नसलेली एक गोष्ट सांगू ? ते मला टॅलेंटेड गर्ल म्हणाले ! माझ्यासाठी ते वशिला पण लावणार आहेत ! जे तुम्हाला जमलं नाही ते नंदकुमार करणार आहेत !
काली० : ( वैतागून ) तू तुझं तोंड जरा बंद ठेवशील का ?
कांचन : डॅडी, आता माझी काळजी मिटली ! मला मोठा आधार मिळाला ! डॅडी यांची पर्सनॅलिटीसुद्धा किती आकर्षक आहे नाही ? खरं म्हणजे हे हिरो व्हायला हवे होते.

कालीo : ( चिडून ) शटअप! कुठं काय नू कसं बोलावं याचासुद्धा पोच नाही तुला.
नंद० : अहो तशी ती लहान आहे अजून, मला आवडली.
कालीo : हे सांगण्यासाठी तुम्ही इथं आलात ?
नंद० : नाही, यामिनी आहे का ते बघायला आलो.
कालीo : यामिनीनं तुम्हाला इथं भेटायला बोलवलं होतं ?
नंद० : तिनं सांगितलं नव्हतं; पण यावं लागलं. तिच्या धाकट्या मुलीचा ताप बराच वाढला आहे. मी माझ्या डॉक्टर-मित्राला तिच्याजवळ बसवून आलो आहे.
कांचन : त्या सकाळी येऊन गेल्या. फार कामात आहेत असं म्हणाल्या.
नंद० : मुलगी आजारी असताना कामावर जाणं हे मला मुळीच पसंत नाही.
कालीo : ( तिरकसपणे ) ते तिनं ठरवायचं, तुमच्या पसंती-नापसंतीचा प्रश्न येतोच कुठं ?
नंद० : तुम्ही एखाद्या लहान मुलीला लळा लावलात कधी ? ही लहान मुलं इतक्या निःस्वार्थीपणे प्रेम करतात की—
कालीo : तुम्हाला भलताच लळा दिसतोय यामिनीच्या मुलींचा ?
नंद० : दोन्ही पोरी फार गोड आहेत. त्यांना आईची माया मिळाली; पण बापाचं प्रेम नाही मिळालं. दोघांचं प्रेम मिळालं म्हणजे मुलं फुलतात कमळासारखी... चारही बाजूंनी.
कांचन : द्या टाळी नंदकुमार! काय लाख मोलाचं बोललात तुम्ही ?
कालीo : कांचन, तुला मधे बोलायची गरज ? तुझं मन विचारलं नाही कुणी इथं.
कांचन : विचारलं नसलं म्हणून काय झालं ? जागतिक सत्य सांगितल्यावर दाद नको द्यायला ?
नंद० : मी खप गुंतलोय यामिनीच्या मुलींमध्ये
कालीo : त्याचं कौतुक मला सांगू नका, मीसुद्धा दोन मुलांचा बाप आहे.
कांचन : त्यापैकी एक मुलगी म्हणजे मी आणि दुसरा माझा भाऊ.
कालीo : कांचन, तू आत जा! इथं काहीही काम नाही तुझं.
कांचन : आत कशाला ? माझी अडचण होत असेल तर मी बाहेरच जाते नाहीतरी मला जायचंच होतं. तुम्ही पुण्याहून परतण्याची वाट बघत होते मी.
कालीo : कुठं चाललीस तू ?
कांचन : बऱ्याच लोकांच्या गाठीभेटी घ्यायच्या आहेत मला. कॉन्टॅक्टस् वाढवले पाहिजेत ना ? डॅडी, तुमची गाडी घेऊन जाऊ ? (कालीदास तोंड फिरवतो) हे बघा, द्यायची असली तर द्या नसेल तर सरळ नाही म्हणून सांगा. मी स्वतःच्या हिमतीवर कुठेही जाऊ शकते. रस्त्यात नुसता अंगठा वर केला तर भारी भारी गाड्या थांबतात मला लिफ्ट द्यायला. हिरॉइन व्हायच्या आधी ही पत आहे माझी मुंबईत

कालीο : कांचन, ही मुंबई आहे, सोलापूर नाही. भलत्या भ्रमात राहू नको.

कांचन : तुमची गाडी गेली उडत. मि. नंदकुमार, तुम्ही मला सोडाल तुमच्या गाडीनं ?

नंदο : जरूर.

कांचन : मग मी बाहेर थांबते, तुम्ही या. अन् डॅडी तुमच्यासाठी चिकन-बिर्याणी करून ठेवली आहे ती खा. बाय बाय !

( कांचन जाते. कालीदास अस्वस्थ होतो. )

नंदο : पोरगी मोठी गोड आहे नाही ?

कालीο : हे पाहा, माझ्या मुलीला लळा लावण्याचा प्रयत्न करू नका. आणि ती काय बडबडते ते मनावर घेऊ नका.

नंदο : यामिनीला मी येऊन गेल्याचं सांगा आणि तिला ताबडतोब घरी पाठवा.

कालीο : मिस्टर नंदकुमार, तुम्हाला स्वतःची मुलं किती ?

नंदο : एकही नाही. कारण लग्नच झालेलं नाही.

कालीο : अच्छा ! मग यामिनीसाठी मुलींना लळा लावलात का मुलींसाठी यामिनीशी दोस्ती केलीत ?

नंदο : मिस्टर के. के., ठरवून काहीच करता येत नाही. हे आपोआप होत असतं. तुमच्या आणि यामिनीच्या मैत्रीची कल्पना आहे मला. मुलींच्या कल्याणासाठी तिनं तुमच्याशी लग्न करावं असा मीच सल्ला तिला दिला.

कालीο : ही कल्पना तुमची आहे तर !

नंदο : अर्थात. कारण यामिनीपेक्षा तिच्या मुलींचं आयुष्य अधिक महत्त्वाचं आहे.

कालीο : पण तुम्ही अजून तुमच्या लग्नाचा विचार केला नाहीत ?

नंदο : नाही.

कालीο : मला वाटतं, तुम्ही तुमच्या लग्नचा निर्णय लौकर घेतलात तर बरं.

नंदο : थँक्स ! मी तर घेईनच; पण तुम्ही लग्नाचा निर्णय घेणं अधिक निकडीचं. बाय बाय.

(नंदकुमार जातो. कालीदास त्याच्याकडं बघत राहतो.)

(अंधार होतो. प्रवेश संपतो )

म. ग्रं. स. ठाणे, वाचनालय [illegible]
ग्रं. क्र. ........ नों. दि. ........
वि. नाटक

# अंक दुसरा

♡

## ( प्रवेश दुसरा )

[ मध्यरात्र उलटून गेली आहे. दीड-दोनचा सुमार झाला आहे. कांचन अजून घरी परत आलेली नाही. कालीदास अस्वस्थपणे सिगरेट ओढीत कांचनची वाट पहात आहे. फेऱ्या घालतो आहे. तेवढ्यात दाराची बेल वाजते. कांचनच असणार ह्या अपेक्षेने काहीसा आनंदित होऊन कालीदास दार उघडतो. दारात यामिनी. ]

कालीο : (हताशपणे) तू होय?

यामिनी : का? मी येईन अशी अपेक्षा नव्हती?

कालीο : कांचन आली नाही अजून! गेल्या आठवड्यात तीन वेळा रात्री उशीरा आली ह्या आठवड्यात ही दुसरी वेळ. ती कुठं जाते, काय करते? मला हे मुळीच आवडत नाही.

यामिनी : कमाल आहे! एका अनोळखी पोरीची तू एवढी चिंता करतोस?

कालीο : अनोळखी? माझी रक्तामांसाची मुलगी आहे!

यामिनी : आजच नाही—गेली एकोणीस वर्षे ती तुझी मुलगी आहे. पण गेल्या सोळा वर्षांत एक क्षणभरही तू तिची काळजी केली नाहीस!

कालीο : सोळा वर्षांची गोष्ट वेगळी होती.

यामिनी : खरं तर मी आज येणार नव्हते; पण उशीर झाला तरी आले.

कालीο : (आपल्याच नादात आहे) छे! ..ही पोरगी चुकली तर नसेल? मुंबईची काहीच माहिती नाही. निदान फोन करायची तरी अक्कल सुचायला हवी होती.

यामिनी : मला आणखी एका पिक्चरचं कॉन्ट्रॅक्ट मिळालं आज. अर्थात नंदमुळं

कालीο : (निर्विकारपणे) चांगलं झालं.

यामिनी : तुला माहीत आहे? नंद इतकं चांगलं बोलतो की —

कालीο : हे सांगायला तू इतक्या रात्री इथं आलीस? हे बघ, मी माझ्या मुलीच्या काळजीत आहे. तुझं नंदकुमार-पुराण बंद कर.

यामिनी : तू एकदा भेट त्याला.

कालीο : काही गरज नाही, तो परवा इथं आला होता मी पाहिला त्याला.

यामिनी : कसा वाटला ?

कालीο ; निर्बुद्ध ! एक मामुली कॅमेरामन तो काय आणि त्याचं कौतुक किती ?

यामिनी : तुझा मत्सर जागा झाला आहे. तू त्याला पाहिलं असशील पण तू ओळखत नाहीस त्याला

कालीο : मला मुळीच गरज नाही ओळख करून घ्यायची.

यामिनी : मी आले ती एक कल्पना सांगायला. कांचन गेल्यानंतर तू माझ्याकडं येऊन राहावसं. माझं घर मोठं आहे. शिवाय मुलींनाही तुझी सवय होणं आवश्यक आहे.

कालीο : नो थँक्स !

यामिनी : मग तुझ्या जीवनात माझं स्थान काय आहे ते तरी कळू दे मला ! जन्मभर तुझी रखेली म्हणून राहू ?

कालीο : असली चीप भाषा तू वापरू नकोस

यामिनी : मग काय अंगवस्त्र म्हणू ? शब्द बदलल्यानं नाती बदलत नाहीत.

कालीο : हे बघ, आत्ता रात्रीचे दोन वाजले आहेत. माझ्या मुलीच्या काळजीनं मी आधीच हैराण आहे.

यामिनी : तुला तुझ्या मुलीची काळजी वाटते आणि मला माझ्या मुलींची वाटू नये ? त्यांच्या भवितव्याचा विचार मी नाही करायचा तर कुणी ? त्या वयानं वाढताहेत. त्यांना आपले संबंध कळायच्या पूर्वी —

कालीο : मी तुझ्याशी लग्न करावं, असंच म्हणायचं आहे ना तुला ?

यामिनी : मला वाटतं, गेली चार वर्षं आपण याबद्दल चर्चा केली आहे. आता निर्णय घेण्याची वेळ आली आहे असं नाही वाटत तुला ?

कालीο : निर्णय मी घेतलाच आहे. आपले आहेत तसेच संबंध राहिले तर ते दोघांनाही सोयीचं होईल.

यामिनी : याचाच अर्थ तू स्वतःच्या पलीकडं विचार करायला तयार नाहीस !

कालीο : यामिनी, या घटकेला तुझ्याशी वाद घालायला माझा मूड नाही. या क्षणाला माझ्या दृष्टीनं जगातली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कांचन सुखरूप परत येणं ही आहे.

यामिनी : ( तडफेनं ) अच्छा ! बाय... बाय ! ( जाते. कालीदास पुन्हा गॅलरीतून कांचनसाठी पाहतो. घड्याळाकडे पाहतो. )

कालीο : ( स्वतःशीच ) अडीच वाजले ! ह्या पोरीनं माझा अंतच पाहायचं ठरवलेलं दिसतंय. नसता ताप होऊन बसला आहे डोक्याला.

( पुन्हा एकदा गॅलरीतून पाहतो. दार उघडून बाहेर डोकावतो. अस्वस्थ होऊन रमची बाटली काढतो. रम ग्लासात ओतणार इतक्यात बेल वाजते. तसाच ग्लास ठेवून उठतो व रागानेच दार उघडतो. कोण आहे हे न पाहताच रागाने ओरडतो — )

कालीο : शरम नाही वाटत तुला ?

( नंदकुमार नवलाने त्याच्याकडे पाहात उभा राहतो)

नंदο : मला म्हणालात ?

कालीο : तुम्ही ? यामिनीला शोधायला आला असाल तर ती इथं नाही.

नंदο : नाही, मी त्यासाठी नाही आलो.

कालीο : मग इतक्या रात्री तुम्हाला इथं येण्याचं कारण ? आता काय पाहिजे तुम्हाला ?

नंदο : मला काहीही नको.

( नंदकुमारच्या पाठीमागे लपलेली कांचन दारातून आत येते )

कांचन : डॅडी, ते मला पोचवायला आलेत.

नंदο : त्यांनी येण्याचं कारण ?

कांचन : कारण मी झकासपैकी रस्ता चुकले. कुणाला विचारावं म्हटलं तर रस्त्यात माणूसही दिसेना. तेवढ्यात नंदकुमारची गाडी दिसली. मला पोचवलं. अहो, त्यांनी कॉफीसुद्धा पाजली.

कालीο : मूर्ख आहेस !

कांचन : का ? कॉफी प्यायले म्हणून ? त्यांना थँक्स तरी म्हणा. अहो तुमची मुलगी त्यांनी सुखरूप आणून पोचवली.

कालीο : ( नंदकुमारला ) अच्छा ! यामिनी इथं नाही.

नंदο : बाय...बाय...कांचन.

कांचन : माझं नाव प्रोड्यूसरना सांगायला विसरू नका. मला नुसता फोन करा—मी म्हणाल तिथं येईन.

(नंदकुमार जातो. कांचन शांतपणे आत जाऊ लागते. कालीदास उसळतो. .

कालीο : लाज नाही वाटत तुला ?

कांचन : (कानावर हात ठेवून) बाप रे ! केवढ्यांदा ओरडता ? माझं हार्टफेल झालं असतं म्हणजे ?

कालीο : हार्ट असलं तरच ते फेल होईल ना ? रात्री तीन-तीन वाजेपर्यंत कुठं भटकतेस ? तू कुठं गेली होतीस ? सांग मला—

कांचन : बाहेर गेले होते.

कालीं० : ओऽह ! — हे काय उत्तर आहे माझ्या प्रश्नाचं ! कांचन, धिस इज टू मच नेहमी अशी उशीरा येतेस —

कांचन : कदाचित पुन्हा दोन दिवसांनी रात्री मला —

कालीं० : ( भडकून ) कुठं होतीस ते सांग आधी.

कांचन : एका बंगल्यात होते. मजेत होते. तुम्हाला इतकं रागवायला काय झालं ?

कालीं० : हे...हे तू मला—तुझ्या बापाला विचारतेस ? हेच वळण लावलं तुझ्या आईनं ? संध्याकाळी बाहेर पडतेस ! रात्री तीन-तीन वाजेपर्यंत बाहेर राहातेस ! फोनसुद्धा करीत नाहीस ! कुणा तरी तिऱ्हाइताबरोबर परत येतेस ! आणि वर मला विचारतेस, इतकं रागवायला काय झालं म्हणून ? तुझ्याइतका मी बेजबाबदार नाही

कांचन : मी सुद्धा बेजबाबदार नाही.

कालीं० : कांचन, मला खिजवू नकोस. मी तुझ्या तालावर नाचणार नाही.

कांचन : मी तुम्हाला नाचायला सांगितलेलं नाही.

कालीं० : पुरलेस ! तुला वडील माणसांसमोर कसं बोलावं हे सुद्धा कळत नाही ! निर्लज्जासारखी वर तोंड करून बोलतेस ती ?

कांचन : आता मी बोलणार नाही, मी जाऊन झोपते आता गुड नाइट !
(जाऊ लागते)

कालीं० : थांब, माझ्या सहनशीलतेचा अंत पाहू नकोस. तुला इतका उशीर का झाला आणि इतका उशीर तू काय करीत होतीस याचं उत्तर मला मिळालंच पाहिजे.

कांचन : मी निरनिराळ्या लोकांना भेटायला गेले होते.

कालीं० : कोण होते हे लोक ?

कांचन : फिल्मलाइनशी संबंधित असे महत्त्वाचे लोक होते

कालीं० : पण कोण ?

कांचन : एन्. सी. सिप्पी, बी. आर चोप्रा, रामानंद सागर, शशिकपूर, ऋषीकपूर, शत्रुघ्न सिन्हा, धर्मेंद्र,...

कालीं० : बरीच नावं पाठ आहेत म्हणायची तुला ?

कांचन : पाठ नाहीत—यांना मी भेटले.

कालीं० : सगळ्यांना ? त्यांच्याशी गप्पा मारल्यास ?

कांचन : तशा खास अशा गप्पा झाल्या नाहीत; पण नमस्ते, ग्लॅड टू सी यू... यु लुक क्यूट...थँक्स, वगैरे वगैरे...

कालीं० : पण हे कुठं घडलं सारं ?

कांचन : एका पार्टीत

कालीं० : पार्टीत ? तुला आमंत्रण होतं त्या पार्टीचं ?

कांचन : आमंत्रण नसताना मी कशाला जाईन तिथं ?

कालीο : आपल्याला कुणी आमंत्रण दिलं होतं हे कळेल का मला ?

कांचन : गं . गो.. बा.

कालीο : कोण गंगोबा ?

कांचन : गंगाधर गोपाळ बाके

कालीο : हे काय प्रकरण आहे ?

कांचन : प्रकरण नाही, हा माणूस आहे. त्यानंच मला जॉब दिला.

कालीο : जॉब ! कसला जॉब ? मला कधी काही बोलली नाहीस ते ?

कांचन : कॅटरिंग सर्व्हिस.

कालीο : अच्छा ! म्हणजे हा गंगोबा आचारी आहे आणि वाढपी म्हणून तुला त्यानं जॉब दिला आहे.

कांचन : तसं नाही. गंगाधर गोपाळ बाके या माणसाची एक कॅटरिंग सर्व्हिस आहे. मोठमोठ्या पार्ट्यांसाठी ड्रिंक्स, डिनर, आइस्क्रीमची व्यवस्था तो करतो. यासाठी वेगवेगळे गट असतात. म्हणजे ड्रिंकसाठी एक, डिनरसाठी एक, आइस्क्रीमसाठी एक - पण आइस्क्रीमसाठी त्यानं एक आयडिया केली आहे.

कालीο : हे जे गट म्हणालीस ना, त्यालाच जुन्या भाषेत वाढपी म्हणतात—काय आयडिया केलीय ह्या गंगोबानं ?

कांचन : त्यानं एक 'उद्याचे कलाकार', म्हणजे 'कल के कलाकार' नावाची एक संघटनाही काढली आहे. तुम्ही पन्नास रुपये भरून संघटनेचं सभासद व्हायचं.

कालीο : मला नाही सभासद व्हायचं.

कांचन : अहो, तुम्ही म्हणजे आमच्यासारख्या होतकरू कलाकारांनी. मग हा गंगोबा आम्हाला सिने कलाकारांच्या बर्थडे पार्टीत किंवा मुहूर्ताच्या पार्टीत आइस्क्रीम कौंटरवर उभं करतो.

कालीο : म्हणजे वेटर बनवतो तुम्हाला ?

कांचन : नाही, तिथं आजचे बडे कलाकार आइस्क्रीम घ्यायला आले की उद्याच्या कलाकारांशी त्यांची ओळख होते मग 'हाय नमस्ते', 'हाउ स्वीट' अशी शब्दांची देवाण-घेवाण होते. मस्त आहे की नाही आयडिया ?

कालीο : वा ! अशानं ओळखी होतात असं वाटतं तुला ?

कांचन : याच्या पुढचा भाग महत्त्वाचा आहे. अहो पार्टी संपायच्या आत, आम्ही होतकरू कलाकारांनी हळूच बाहेर जाऊन, प्रत्येकाच्या गाडीच्या विंडशील्डवर किंवा ड्रायव्हरला बक्षीस देऊन, मागच्या सीटवर आपल्या नावाचं कार्ड टेवायचं.

कालीο : कार्ड ?

कांचन : अहो ते 'कल के कलाकार' संघटनेचं कार्ड आहे. त्यावर संघटनेचा फोन नंबर आहे. त्याच्या मागच्या बाजूला आपलं नाव लिहायचं. गेल्या आठवड्यात मी पन्नास कार्ड ठेवली. कुणी फोन केला तर गंगोबा ज्याचं नाव त्या कार्डावर असेल त्याला निरोप पाठवून अमक्या प्रोड्युसरला किंवा डायरेक्टरला भेट असं कळवतो.

काली० : सगळा मूर्खपणाचा बाजार आहे. चित्रपट धंद्यातले लोक इतके बुद्दू आहेत असं तुला वाटतं ! अशा पद्धतीनं कुणीही तुला बोलावणार नाही.

कांचन : नाही बोलावलं तरी हरकत नाही. निदान आपण प्रयत्न करतो आहोत याचं समाधान काही कमी नाही.

काली० : मग कान उघडे ठेवून ऐक. तुला ह्या लाइनमध्ये अजिबात चान्स नाही. प्रोड्युसर, डायरेक्टर किंवा नटनट्यांच्या गाड्यांवर कार्ड खोचून हिरॉइन बनता येत नाही.

कांचन : मग महालक्ष्मीच्या किंवा पुण्याच्या रेसकोर्सवर रेस खेळून, लोक संगीत-दिग्दर्शक कसे बनू शकतात ?

काली० : कांचन, मला बोचकारण्याचा प्रयत्न करू नकोस मी संतापलो तर थोबाडीत मारायलाही कमी करणार नाही.

कांचन : मग मलाही उपदेश करण्याचा प्रयत्न करू नका. तुम्ही विचारलंत म्हणून सांगितलं. नाहीतर मलाही गरज नव्हती तुम्हाला सांगायची.

काली० : हा गंगोबा माणूस कसा आहे ?

कांचन : चांगला आहे. केस छान आहेत-डोळे बोलके आहेत-रंगाने गोरा आहे-आकर्षक आहे.

काली० : तुझ्यासारख्या किती मुली आहेत त्याच्या संघटनेत ?

कांचन : तीन; पण तो माझ्याकडेच जास्त लक्ष देतो.

काली० : म्हणजे काय करतो ?

कांचन : म्हणजे हेच आपलं .. कमॉन डार्लिंग, तू सर्वात पुढे उभी राहा — तुझ्यासारखी स्मार्ट मुलगी पाहिली नाही अजून—तुला पंजाबी ड्रेस फारच खुलून दिसतो—असं सारखं काही ना काही म्हणत असतो.

काली० : मूर्ख आहेस तू ! हे, हे अधिक लक्ष देण्याचं प्रकरण साधं नाही आयुष्यातनं उठशील तू — तू सोलापुरात होतीस तेच बरं होतं.

कांचन : अहो, पण मी सोलापुरात राहून माझी अन् गंगोबाची भेट कशी झाली असती ?

काली० : हा वेडेपणा आहे — शुद्ध वेडेपणा आहे.

कांचन : अहो, आज गंगोबानं माझी एका असिस्टंट डायरेक्टरशी ओळखसुद्धा करून दिली तो असिस्टंट डायरेक्टर मला म्हणाला, ' एकदा माझ्या हॉटेलवर येऊन भेट. तुझी स्क्रीन टेस्ट घेऊ '— अन् तुम्हाला वाटतं मला कधीच चान्स मिळायचा नाही.

काली० : (वैतागून) अडाणी पोरी, तुला कसं समजावून सांगावं तेच कळत नाही मला. अग हे स्क्रीन टेस्ट वगैरे सगळं खोटं आहे ... तुला फसवण्याचा एक बहाणा आहे. हे सगळे प्रकार वाईट आहेत. यामुळं तुझ्या आयुष्याच्या चिंध्या होतील. अग, स्त्री-पुरुष संबंधांची तुला कल्पना नाही. मम्मीनं कधी सांगितलं नाही तुला ?

कांचन : नाही. ती म्हणाली, ' सगळे पुरुष हरामखोर असतात '— त्यात तुम्हीही आलात; पण मला तिचं म्हणणं पटत नाही.

काली० : तुझ्या आजीनं तरी ?

कांचन : अजिबात नाही.

काली० : मग मी सांगतो, हा गाढवपणा आहे. ही वाट धोक्याची आहे.

कांचन : धोक्याची असली तरी त्या वाटेनं मला गेलंच पाहिजे. आपलं ध्येय गाठण्यासाठी कितीही अडचणी आणि धोके असले तरी त्यांना तोंड देऊन पुढं जाण्यातच खरा पुरुषार्थ असतो. हे तुम्ही क्रमिक पुस्तकात कधी पाठ केलं नाही ?

काली० : डोण्ट बी स्टुपिड कांचन !

कांचन : हे पाहा, मला माझ्या मार्गानं जाऊ द्या तुम्ही मला जन्म देऊन निघून गेलात. मम्मी तुम्ही गेल्यापासनं हरवलेली तुमच्या माहितीसाठी सांगते, तुम्ही गेल्यानंतर तिच्या आयुष्यात कुणीही पुरुष आला नाही. डेअरीवाल्याची गोष्ट तुम्हाला जळवण्यासाठी सांगितली.

काली० : म्हणजे ?

कांचन : तुम्ही गेलात आणि तिचं स्वत्वच गेलं. ती मनानं तुमच्याभोवती घिरट्या घालीत राहिली. ती शरीरानं आमच्याबरोबर राहिली तरी मनानं ती कधीच सती गेली होती. आम्हाला आई मिळालीच नाही. (सावरून) जाऊ दे— मी कालच्याच गोष्टी सांगत बसले तुम्हाला.

काली० : (हळुवारपणे) म्हणून सांगतो तुला. तुझ्या मम्मीला आणखी दुःख होऊ नये असं वाटत असेल तर गंगोबा, कॅटरिंग सर्व्हिस, कार्ड या गोष्टी सोडून दे. हिरॉइन होण्याचं वेड डोक्यातून काढून टाक.

कांचन : (भडकून) तुम्ही कोण सांगणार मला ? तुम्ही मम्मीला जे दुःख दिलंत, त्याच्यापुढं माझ्यामुळं होणारं दुःख किस झाड की पत्ती ठरेल. मी माझ्या ध्येयाकडं निघाले आहे—मला आता कोणीही अडवू शकत नाही.

काली० : मूर्ख पोरी, मी इतका वेळ तुझ्या कानीकपाळी ओरडलो. त्याचा अर्थही कळत नाही तुला ? तुझ्या आयुष्याचा उकिरडाच करायचा असेल तर मी कोण अडवणार ?

कांचन : आत्ता उकिरडा होईल कदाचित; पण एकदा हिरॉईन झाले की सगळं विसरतात. ती अत्यंत नीतिमान आणि चारित्र्यसंपन्न होते, प्रतिष्ठित ठरते. मंत्रीसुद्धा खुर्चीतून उठून तिच्या स्वागताला धावत पुढे येतात.

काली० : हे बघ कांचन, तुला जगाचा अनुभव नाही. काहीतरी डोक्यात घेऊन तू इथं आली आहेस. माझ्या घरात राहून माझ्या डोळ्यादेखत असले वेडेचार मी तुला करू देणार नाही. हे सगळं बंद झालंच पाहिजे.

कांचन : मी मुळीच बंद करणार नाही.

काली० : (चिडून) तू सोलापूरला परत जा.

कांचन : जाणार नाही. गंगोबाला सोडणार नाही.

काली० : मला हे चालायचं नाही.

कांचन : तुम्हाला चालतं की नाही याची मला पर्वा नाही. मी दोन दिवसांनी पुन्हा पार्टीला जाणार आहे !

काली० : तू माझं काहीच ऐकणार नसशील तर मलाही तुझ्याशी संबंध ठेवायचा नाही.

कांचन : नाहीतरी गेली सोळा वर्षं कुठं ठेवला होतात संबंध ?

काली० : (भडकून) शटअप ! मायेपोटी तुझं तिरकस बोलणं, टोमणे मी आतापर्यंत ऐकून घेतले. यापुढं मला ते जमणार नाही.

कांचन : मलासुद्धा तसंच वाटतं. माझं इथं जमणार नाही. इथं आले हीच चूक झाली. नंदकुमारसुद्धा मला म्हणत होते, इथं तुला कंटाळा आला तर माझ्याकडं ये चार दिवस.

काली० : जा . जा ..त्या नंदकुमारकडं जा— त्या असिस्टंट डायरेक्टरच्या हॉटेलवर जा— गंगोबाकडं— बापापेक्षा ते तुला अधिक जवळचे आहेत ना ?

कांचन : निश्चितच ! ते निदान डोक्याला त्रास तरी देत नाहीत.

काली० : म्हणजे मी तुझ्या डोक्याला त्रास देतो ?... मी नाही तू....तू त्रास देतेस माझ्या डोक्याला. तुझा ताप झालाय मला. तुझ्यामुळं मी बेचैन होतोय— हैराण होतोय.

कांचन : चोराच्या उलट्या बोंबा म्हणतात त्या ह्याच.

काली० : बस्स ! तू चालायला लाग. तुझ्या अंगावर हात टाकायची वेळ माझ्यावर आणू नकोस. तुला जे काही करायचं असेल ते कर - पण माझ्या डोळ्यापुढं नको. माझी सहनशक्ती संपली आहे.

कांचन : माझी तरी कुठं शिल्लक राहिली आहे ?

कालीο : (पुन्हा भडकून) आता एक शब्दसुद्धा तोंडातून काढू नकोस. माझ्या नजरे-समोरून चालती हो, तुझ्यासारख्या मूर्ख पोरीला जन्म दिला याची लाज वाटते मला. यू गेट आऊट—आऊट.

कांचन : अच्छा ! बाय बाय ! मी जाते, तुम्हाला सांगून जाते. मी जुहूच्या हॉटेल शोनानमध्ये असिस्टंट डायरेक्टरला भेटायला जाते. पुन्हा तोंड दाखवणार नाही तुम्हाला.

(कांचन ताडकन निघून जाते. ती गेल्यावर कालीदास जरा शांत होतो. पण लगेच अस्वस्थ होतो. तो लगबगीने दारातून बाहेर जातो. पण कांचन दिसत नाही म्हणून हताश होऊन परत येतो. सुन्नपणे बसून राहतो. गॅलरीत जाऊन पाहतो. अचानक आठवण झाल्याप्रमाणे फोनपाशी जातो. डायरी काढून नंबर फिरवतो.)

कालीο : हॅलो...हॅलो...सांताक्रूझ पोलीस स्टेशन ?... नाही.. नाही. चोरी, खून वगैरे काही नाही...सकाळी काय सकाळी ? आत्ता मला बोलायचंय इन्स्पेक्टर खंडाळे यांच्याशी. हो हो...ते माझे मित्र आहेत. (थोडा वेळ फोन धरून उभा राहतो.) हॅलो, खंडाळे ? मी कालीदास कान्हेरे बोलतोय. हे बघ केशव, मी अत्यंत काळजीत आहे. माझी मुलगी—कांचन तिचं नाव ती माझ्याशी भांडून घरातून निघून गेली आहे. अरे, तिला मुंबईची काही माहिती नाही. जरा पोरकट आहे. हो...हो...जुहूच्या शोनान हॉटेलमध्ये जाते असं म्हणाली. तिथं कुणी असिस्टंट डायरेक्टर राहतो. नाही.. मला त्याचं नाव माहीत नाही. तेव्हा प्लीज तिला आणून पोचतं कर. फार फार मेहेरबानी होईल. मग मी वाट पाहू तुझ्या फोनची ? थँक्स... (फोन ठेवतो. हताश होतो. करायला काहीच नाही म्हटल्यावर रमचा ग्लास भरतो. फोनजवळ येऊन फोनची वाट पाहात बसून राहतो. सिगरेट पेटवतो. त्याचं लक्ष नाही असं पाहून कांचन हळूच दार उघडून बाहेरून आत येते. लगतच्या कोचावर झोपेचं सोंग घेऊन पडते. तेवढ्यात फोन वाजतो. कालीदास उचलतो.)

कालीο : हॅलो...मी कान्हेरे बोलतोय....काय झालं ? शोनान हॉटेलमध्ये ती नाही ? तू खात्री करून घेतलीस ? व्हॉट ? फिल्म लाइनमधला कोणीही तिथं नाही ? मग ही पोरगी गेली तरी कुठं ?...आय ॲम टेरिब्ली वरिड...एनी वे ..थँक्स....

(निराशपणे फोन ठेवतो आणि वळून पाहतो तो कांचन कोचावर झोपलेली. तो आवेगाने भारावून तिच्याजवळ जातो. तिच्या डोक्यावरून हात फिरवतो. डोळे पुसतो. आणि आपल्या बेडरूममधे जातो. अंधार होतो.)

(प्रवेश समाप्त.)

□

# अंक दुसरा

♡

## ( प्रवेश तिसरा )

[ सकाळ होत आहे. पाखरांची किलबिलाट. गॅलरीतून बाहेर थोडेसे धुकेही दिसते. एखादी रिक्षा गेल्याचा आवाज ऐकू येतो. तेवढ्यात फोन वाजतो. कालीदास आतून येऊन फोन उचलतो. ]

कालीο : हॅलो...गुडमॉर्निंग...यामिनी ? उजाडता उजाडता फोन केलास ? काही विशेष ?...हां बोल....( चेहऱ्यावर वैताग दिसू लागतो. ) हे बघ, रात्री तू आणि नंदकुमारनं काय केले हे ऐकण्यात मला अजिबात इंटरेस्ट नाही. तू मला डिवचते आहेस काय ?...मग....सरळ सांग....( ऐकतो ) ओ ऽ आयसी....! तुम्ही लग्न करताय आजच ?... कळवल्याबद्दल थँक्स ! .. सॉरी...बेस्ट विश्शेस देण्याच्या मूडमध्ये नाही मी. ( फोन बंद करतो. ठेवतो. तेवढ्यात कांचन पाठीवर सॅक बांधून आतून बाहेर येते. )

कांचन : डॅडी, तुमचा निरोप घ्यायला आले.

कालीο : निरोप घ्यायला म्हणजे ?

कांचन : म्हणजे मी चालले परत सोलापूरला.

कालीο : सोलापूरला ?

कांचन : दुसरीकडं कुठं जाणार मी ?

कालीο : केव्हा ठरवलंस जायचं ?

कांचन : काल रात्री.

कालीο : का ? मी रात्री रागाच्या भरात जा म्हणालो म्हणून ?

कांचन : छे: छे: ! त्याच्याशी काही संबंध नाही हे घर तुमचं आहे. कुणाला घरात ठेवायचं, कुणाला हाकलायचं हा तुमचा प्रश्न आहे. तुम्ही येऊन रहा म्हणालात, म्हणून आले. जा म्हटल्यावर जायला पाहिजे.

कालीο : पण का चाललीस ? माझा कंटाळा आला तुला ?

कांचन : नाही; पण माझ्या इथं राहण्यानं तुम्हाला मनःस्ताप होतो, तुम्ही हैराण होता. तुमच्या स्वातंत्र्याला मर्यादा पडतात. शिवाय मला तसा आदेश आला.

कालीο : कुणाचा आदेश ? तुझ्या आजीचा ?

कांचन : मलासुद्धा प्रथम तसंच वाटलं. काल अर्धवट जागी झाले. माझ्या कानावर शब्द आले, 'कांचन, तू आता परत जा. तुझं काम झालं आहे'—मला वाटलं आजीच असणार. जागी होऊन पाहते तो माझाच आवाज होता. लगेच निर्णय घेऊन टाकला.

कालीο : मी सख्खा बाप असून त्याला विचारायची गरज वाटली नाही तुला ?

कांचन : मी येताना तरी तुम्हाला विचारून कुठं आले होते ?

कालीο : हे बघ, तू बैस जरा. तेवढा वेळ आहे ना ?

कांचन : हो...तसा वेळ आहे. बाय द वे, कुणाचा फोन आला नव्हता ना माझ्यासाठी ?

कालीο : कुणाचा येणार होता ? गंगोबाचा ?

कांचन : गंगोबाचा नाही, दुसराच एक यायचा होता. ते जाऊ द्या.

कालीο : तुझ्या या अचानक जाण्याचं गूढ कळत नाही मला ! खरं तर आज मी तुझ्यासाठी खास कार्यक्रम आखला होता.

कांचन : माझ्यासाठी ?

कालीο : होय, फक्त तुझ्यासाठी. तू आणि मी सकाळी चांगल्या हॉटेलात ब्रेकफास्ट, समुद्रस्नान, फर्स्टक्लास लंच, दुपारी चित्रपट आणि रात्री डिनर अन् नाटक.

कांचन : थँक्यू डॅडी. पण आता ते जमणार नाही.

कालीο : तुझ्या करियरचं काय ?

कांचन : आता गेलं उडत असंच म्हणावं लागणार.

कालीο : माझी फार निराशा केलीस. इतक्या वर्षांनी भेटलीस आणि दोन-तीन आठवडे झाले नाहीत, तेवढ्यात परत निघालीस ?

कांचन : त्याला इलाज नाही डॅडी

कालीο : पण सोलापुरात जाऊन काय करणार आहेस ?

कांचन : अजून विचार केला नाही मी.

कालीο : तसं जर निश्चित काही तुझ्या डोळ्यापुढं नसेल तर आणखी पाचसहा महिने—दोन-तीन महिने—निदान पंधरा दिवस तरी राहायला हरकत नाही. ( बोलावं का न बोलावं या विचारात थांबतो.) खरं सांगतो. गेले दोन-तीन आठवडे माझं मन आनंदानं काठोकाठ भरलं होतं. तू अचानक गेल्यावर—

कांचन : तुम्हाला चुकल्या चुकल्यासारखं वाटेल. पण त्याचबरोबर तुम्हाला रात्र रात्र काळजीही करावी लागणार नाही. पण डॅडी, तुम्ही पत्र लिहा हं मला मी पण लिहीन.

कालो० : पत्राचं नंतर बघू; पण तुला आजच गेलं पाहिजे का !

कांचन : तुम्ही म्हणत असाल तर आज राहाते. उद्या जाईन. तुम्ही ठरवल्याप्रमाणं सर्व कार्यक्रम पार पाडूया.

कालो० : आजचं मरण उद्यावर ढकलून काय साधणार आहे? मला तर आता असं वाटायला लागलंय की तू मुंबईत आलीच नसतीस तर फार बरं झालं असतं.

कांचन : (गहिंवरून) असं नका ना बोलू डॅडी, प्लीज.

कालो० : तू फक्त तीन आठवडे राहणार आहेस असं आधी कळलं असतं तर—

कांचन : तर इतकी माया केली नसतीत, असंच ना ?

कालो० : पोरी, मायेपेक्षा अधिक यातना देणारी एक गोष्ट आहे. ती म्हणजे वियोग. वियोगाचं दुःख मायेपेक्षा असह्य असतं. गेले तीन आठवडे आपण जगात एकटे नाही याची जाणीव झाली. पण—(तोंड फिरवून डोळे पुसतो.) जाऊ दे, तुला सांगण्यात काही अर्थ नाही.

कांचन : डॅडी, मला सगळं काही कळतं; पण—

कालो० : पण पोटात खड्डा कसा पडतो हे कळायचं नाही

कांचन : का ? मलासुद्धा त्या खड्डयाची ओळख आहे. पण मी त्याचा विचार करीत नाही. गेल्या तीन आठवड्यांच्या आठवणी मला पुढची पाच वर्षं आनंद देतील.

कालो० : म्हणजे तुझा जाण्याचा निर्णय पक्का आहे ?

कांचन : अर्थात्.

कालो० : चल मी तुला स्टेशनवर पोचवायला येतो..

कांचन : नको, जशी एकटी आले तशीच जाईन. पण डॅडी, कधी सोलापुरला आलात, तर आमच्या घरी जरूर या. निघू मी ?

कालो० : थांब बेटी, तू जाणारच म्हणते आहेस तर जा. पण जाण्यापूर्वी माझी आठवण म्हणून तुला काहीतरी द्यावंसं वाटतंय. काय आवडेल तुला ? एखादा दागिना ? ड्रेस ? पैसे !

कांचन : यातलं काहीही नको. पण मी मागेल ते द्याल ?

कालो० : माझं उरलेलं आयुष्यसुद्धा तुला द्यायला तयार आहे मी. बोल—

कांचन : तसलं काही नको. फक्त तुमचा एक फोटो द्या.

कालो० फोटो ? अग माझा अलिकडचा फोटो नाही आहे तो जुना आहे दाढीवाला

कांचन : त्याची चिंता करू नका. मी तयारीनिशी आले आहे. (सॅकमधून कॅमेरा काढते.) तुम्ही फक्त पोज द्या. (कॅमेरा ॲडजस्ट करते.) रेडी ? (त्याच्याकडे पाहते). डॅडी, असा काय चेहेरा केला आहे ? स्माइल प्लीज— (कालीदास हसतो.) गुड (फोटो काढते.) वन सेकंद प्लीज (पुन्हा काढते.) हा बल्ल्यासाठी— जरा थांबा डॅडी.

काली० : बस्स झालं, आता मम्मीसाठी म्हणशील.

कांचन : छे छे — पहिला फोटो काढला तो मम्मीसाठी होता— आता हा माझ्यासाठी. (पुन्हा फोटो काढते.) थँक्यू डॅडी ! मी सोलापुराहून तुम्हाला एक कॉपी पाठवून देईन. मी निघू आता ! डॅडी, जरा पुढं या ना .. मला नमस्कार करायचा आहे तुम्हाला— अगदी मनापासनं.

(कालीदास दोन पावलं पुढं येतो. कांचन हात जुळवून वाकून तीन वेळा नमस्कार करते. कालीदासला भरून येतं.)

काली० : पोरी, कशाला आलीस आणि कशाला लावलास लळा इतका ?

कांचन : (अजून वाकलेलीच आहे.) डॅडी, लौकर आशीर्वाद द्या ना ? कबर मोडायची वेळ आलीय.

काली० : (तिच्या डोक्यावर मायेनं थोपटतो) नेहमी सुखात राहा— आनंदात राहा.

कांचन : (तिच्याही डोळ्यात पाणी येतं, पण ती सावरते.) डॅडी, आता खरंच गेलं पाहिजे. नाहीतर मन जड व्हायला लागतं. मन जड झालं की पायसुद्धा जड होतात आणि मग चालणं जड जातं. डॅडी, मायेला जडपणाचा शापच असतो का हो !

(तेवढ्यात फोन वाजतो.)

कांचन : माझाच असणार ! (धावत जाते.) पहाटे मी लावला होता ट्रंक कॉल. (फोन उचलते.) हॅलो ऽऽ हॅलो ऽऽऽ कोण मम्मी ? मी कांचन बोलतेय कशी आहेस तू ?... काय सांगतेस ? माझ्या काळजीनं वाळली आहेस ? कमाल आहे तुझी ! अग इथं रोज माझ्या काळजीनं डॅडी हैराण होताहेत तरी ते इंचभरसुद्धा वाळलेले नाहीत. मम्मी, आज निघतेय मी—रात्री ९–१० वाजेपर्यंत पोचेन. बल्ल्याला पाठवून दे स्टेशनवर. ऑं ! काय म्हणतेस ? ऐकते (माऊथपीसवर हात ठेवून कालीदासला) डॅडी, मम्मी विचारतेय तुम्ही इथं एकटेच राहता का म्हणून ? काय सांगू ? खरं सांगू ? (कालीदास तोंड फिरवतो. कांचन पुन्हा फोनवर) हो .. हो ... तसे एकटेच राहातात. मी आल्यामुळं त्यांना कंपनी मिळाली. (ऐकते) अग माझ्याबद्दल विचारायचं सोडून तू डॅडीबद्दल काय विचारतेस ? हो, ते मजेत आहेत. अजून देखणे दिसतात. (माऊथपीसवर हात ठेवून) डॅडी, तुम्हाला बोलायचंय ? बोलायचं असेल तर बोला, नाही बोललात तरी चालेल. पण बोललात तर मला खूप बरं वाटेल.

कालीο : कांचन.

कांचन : ( फोनवर ) एक्स्टेंड प्लीज ( माऊथपीसवर हात ठेवून ) जास्त नका बोलू. फक्त हॅलो म्हणा. किती तरी वर्षात तिनं तुमचा आवाजसुद्धा ऐकला नाही. तिचा गळा दाटून आलाय.

कालीο : हे काय चालवलं आहेस तू ? अरे ज्या बाईशी मी सोळा वर्षात एक शब्द-सुद्धा बोललो नाही, तिला एका क्षणात हॅलो म्हणणं सोपं नाही.

कांचन : एका क्षणात नको, दोन-चार क्षण घेऊन मग म्हणा.

कालीο : उगीच हट्ट करू नकोस. मला अन् तुझ्या मम्मीलाही अडचणीत टाकू नकोस.

कांचन : ( रागाने ) हे पाहा. मी काही तुमच्यात तडजोड घडवून आणायला आले नाही. केवळ माणुसकी म्हणून बोलायला सांगते तुम्हाला. ( फोनमधे एक्स्टेंड प्लीज. )

कालीο : पण ती माझ्याशी बोलायला तयार होणार नाही.

कांचन : ती हो म्हणाली तर ? (फोनमधे) मम्मी, तू फोनवर नुसतं हॅलो म्हणालीस तर इथं उभं असलेलं एक माणूस तुला हॅलो म्हणेल ... अग बघ तर एकदा. सोळा वर्षानंतर हॅलो म्हटलेलं कसं वाटतंय ते ! ( ऐकते ) थँक्यू मम्मी ... ( माऊथपीसवर हात ठेवून ) बघा ती तयार आहे हॅलो म्हणायला.

कालीο : पण मी कशासाठी हॅलो म्हणायचं ?

कांचन : इतके डरपोक असाल असं वाटलं नव्हतं मला. तुमच्या वागणुकीचा तुम्हाला पश्चात्ताप होत नसेल तर मग का घाबरता ? ( फोनमधे एक्स्टेंड प्लीज )

कालीο : अग हा ट्रंककॉल आहे—बिलाचा जरा विचार कर.

कांचन : बिल तुम्ही भरणार आहात, मग विचार मी कशाला करू ?— ( दरडावून ) बोलणार आहात की नाही ?

कालीο : मी कोण म्हणून बोलू ?

कांचन माझा बाप म्हणून बोला. सोळा वर्षे आमच्याकडं पाठ फिरवलीत, आता फक्त तुमचा मी एक क्षण आणि एक शब्द मागते आहे. तोही मम्मीसाठी. तोही देण्याची तुमची तयारी नसेल तर माणूस म्हणूनसुद्धा मी तुम्हाला कवडीची किंमत देणार नाही.

कालीο : अग पण—

कांचन : ( फोन उघडा ठेवून कालीदासजवळ येते. त्याला खेचते ) कमॉन— ( कालीदास नाइलाज झाल्यासारखा फोनजवळ येतो. कांचन फोनमधे ) मम्मी ! – डॅडी ( कालीदासच्या हातात फोन देते आणि ती आत सटकते )

कालीο : ( फोनवर ) हं....हं... हॅलो...हॅलो... मी...मी कालीदास बोलतोय. मी ठीक आहे. हो...हो... ! तब्येतीला सांभाळतो. तब्येत चांगली आहे. हो .. जेवणखाण सगळं वेळेवर करतो... नाही नाही. मुळीच हेळसांड करीत नाही. स्वतःची...नाही...सकाळी दूध घ्यायचं मात्र जमत नाही. सवय सुटली ना आता :... तू...तू कशी आहेस श्यामला ? तुझं नाव कसं विसरेन मी ? हो...हो...कांचननं दाखवला तुझा फोटो. खराब झाल्यासारखी वाटते. ( ऐकतो ) कांचन ना ! खट्याळ आहे, हट्टी आहे, काहीशी पोरकट आहे, खूप बडबडते...पण मला आवडली. स्मार्ट झालीय....नो...नो, तूच तिला सांभाळलंस, वळण लावलंस—कोण ? बळवंत आहे तिथं ? अरे वा ! दे...दे त्याला फोन....

एक्स्टेंड प्लीज—हॅलो, मिस्टर बळवंत कालीदास कान्हेरे ? हाउ डू यू डू ? अरे, तुझा बाप बोलतोय....स्वर्गातून नाही...मुंबईतून....तुझा आवाज चांगलाच फुटलाय की ? कसा ओळखणार ? फक्त तुझ्या रडण्याचा आवाज ऐकला होता मी. तुझा अभ्यास कसा चाललाय ? ....काय म्हणतोस ? फर्स्ट आलास सोलापूर सेंटरला ? कॉंग्रॅच्युलेशन्स माय बॉय ! ऑं ! काय सांगतोस काय तू ? शाळेच्या फुटबॉल टीमचा कॅप्टन आहेस तू ? वंडरफुल ! कीप इट अप... (कांचन बाहेर येऊन हळूच त्याच्या मागं उभी राहते.) मला खूप बरं वाटलं तुमच्याशी बोलल्यामुळं ..गुडलक—मम्मीलाही गुडबाय सांग...तिला सांभाळ...तिची काळजी घे.

( फोन ठेवतो. गहिंवरला आहे. डोळ्यात पाणी आलं आहे. )

कांचन : हॅलो मिस्टर कालीदास कान्हेरे ?

(कालीदास अश्रू लपवण्यासाठी तोंड फिरवतो पण ते कांचनच्या ध्यानात येते.)

कांचन : डॅडी, डोळ्यात धूळ गेली ना तुमच्या ? मला वाटलंच होतं. सोलापुरात किती धूळ आहे हे पाहिलंत ना ? कसा वाटला माझा भाऊ ?

कालीο : ( खट्याळपणे ) बळवंत नाही— बल्ल्याच वाटला.

कांचन : कदाचित नर्व्हस झाला असेल. बाप नावाच्या प्राण्याशी तो आयुष्यात प्रथमच बोलला ना ! पण तुम्हाला सांगितलं तसा तो नाही. हुशार आहे, स्मार्ट आहे.

कालीο : करेक्ट, ही इज ब्राइट बॉय.

कांचन : बघितलंत ! तुम्ही हॅलो म्हटल्यानं किती जिवांना बरं वाटलं ! मम्मी तर या या क्षणाच्या आठवणीवर पुढचं सगळं आयुष्य काढील बल्ल्या मला गेल्यावर तुमच्याबद्दल हजार प्रश्न विचारून हैराण करील. डॅडी, मलासुद्धा खूप खूप बरं वाटलं. ( एकदम ) अच्छा, डॅडी आता मात्र मी निघते. पुन्हा आलेच तर कोण कांचन ? कुठली कांचन ? कांचन नावाची एकही मुलगी माझ्य माहितीची नाही असं नाही हं म्हणायचं !

कालीο : अगदी जातानासुद्धा ओरबाडल्याशिवाय जाता येत नाही तुला ?

कांचन : तुम्ही दुखावले गेला असाल तर सॉरी...रिअली सॉरी. मी माफी मागते तुमची. नाही तरी जाण्यापूर्वी माफी मागायचीच होती तुमची.

कालीο : कशासाठी ?

कांचन : डॅडी, तुम्ही माझ्यावर रागावणार नाहीत ? ओरडणार नाहीत ? भडकणार नाहीत ?

कालीο : नाही.

कांचन : प्रॉमिस ?

कालीο : प्रॉमिस ! बोल —

कांचन : डॅडी, मी मम्मीची आणि तुमची शपथ घेऊन खरं सांगते—मी तुमच्याशी खोटं बोलले.

कालीο : म्हणजे ? कशाबद्दल खोटं बोललीस ?

कांचन : डॅडी, मला हिरॉइन व्हायचं नाही, श्रीदेवी बनायचं नाही. माझी मुळीच इच्छा नाही. माझी एकच इच्छा होती, मुंबईत यावं आणि तुम्हाला भेटावं. तुम्हाला डोळे भरून पाहावं. तुम्ही कसे दिसता, कसे बोलता, हे मन भरून ऐकावं. तुम्हाला डॅडी म्हणून हाक मारावी. तुमच्या मनात माझ्याबद्दल माया असेल तर त्या मायेत न्हाऊन निघावं. तुमच्या छातीवर डोकं टेकून रडावं. पुन्हा तीन वर्षांची मुलगी व्हावं. तुमच्याकडून खूप लाड करून घ्यावेत.

कालीο : बेटी...बेटी... !

कांचन : डॅडी, गंगोत्रा वगैरे सगळं खोटं होतं. सोलापुरातील तानू मोलकरणीचा भाऊ, जवळच्याच बंगल्याच्या आऊट हाऊसमध्ये राहतो. तोच मला न्यायला स्टेशनवर आला होता. मी पार्टीला वगैरे कुठेही जात नव्हते. त्याच्या घरी जाऊन त्याच्या लहान मुलांशी खेळत होते. तोच मला आणून सोडीत होता. डॅडी ....डॅडी... ( रडू लागते. कालीदास तिला जवळ घेऊन थोपटतो. )

कालीο : शांत हो बेटी. मला सगळ्यांचा अर्थ लागला आहे.

कांचन : डॅडी, कसं सांगायचं तुम्हाला ? तुम्ही हयात असून आम्ही पोरके झालो आहोत ! ( डोळे पुसते. कठोरपणे स्वतःला सावरते. ) डॅडी, जाऊ मी आता ? ( पुन्हा वाकून नमस्कार करते. दाराशी जाते. दारातूनच म्हणते ) डॅडी, तुम्ही रागावलात, संतापलात तरी मला आवडलात. मी धन्य झाले. डॅडी, तुमच्या टेबलावर एक पत्र ठेवलंय ते मी गेल्यावर वाचा. बाय बाय ! ( निघून जाते. कालीदास भारावून तिच्याकडे सुन्नपणे बघत काही क्षण उभा राहतो. त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. डोळे पुसून जड पावलांनी तो टेबलाकडे वळतो. पत्र उचलतो. वाचू लागतो. )

( काचनच्या आवाजात पत्र. )

कांचन अँड कंपनी, सोलापूर.

कायम स्वरूपाच्या बापाची एक जागा रिकामी आहे. मायेच्या रूपानं भरपूर पगार मिळेल. शिवाय आयुष्यात एक उत्तम काम केल्याचं समाधानही मिळेल. गरजूंनी अर्ज करण्याची वा फोटो पाठविण्याची आवश्यकता नाही. सरळ येऊन कामाची सूत्रे हाती घ्यावीत.

ताजा कलम—मुलीचं लग्न ठरलं असल्यानं कन्यादान करण्यासाठी बापाची नितांत गरज आहे. रीतसर आमंत्रण-पत्रिका नंतर येईलच.

( कालीदास क्षणभर डोळे मिटून उभा राहातो. झटक्यात आत जातो व बॅगसकट बाहेर येतो. तेवढ्यात फोन वाजतो. कालीदास फोन उचलतो. )

कालीο : हॅलो ! के. के. स्पीकिंग. सॉरी ! मला नवीन असाइनमेंट घेता येणार नाही. मी बाहेरगावी जातोय. माझं तातडीचं काम आहे. काम महत्त्वाचं आहे. सोळा वर्षांपूर्वी अपुरी राहिलेली एक धून पुरी करायची आहे मला. सॉरी. माफ करा.

( फोन खाईनं ठेवून बॅगेसकट दाराकडं जायला वळतो. तेवढ्यात अंधार होतो. पडदा पडतो. )

( समाप्त )

□

म. ग्रं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 22596 नों. दि 15/12/?
वि. ...... क्र. ..........

IRBK-0122917